साप्ताहीक मराठी बातमी पत्र

SHABNAM NEWS

पिंपरी-चिंचवड-पुणे

मराठी वृत्तपत्र,वृत्तवाहिनी,मराठी न्यूजपोर्टल

# शबनम न्यूज

मुख्य संपादिका : शबनम सय्यद

www.shabnamnews.in

आदर्श नारी पुरस्कार विशेषांक

SHABNAM NEWS | रविवार दि.16/03/2025 | वर्ष 9 वे | अंक 32 | पाने 8 | RNI.No.MHAMAR/2015/47384 | किंमत 2.रु

# राज्यातील शेतकऱ्यांची वाढती आत्महत्या ही बाब चिंताजनक

## शरद पवार



शबनम न्यूज मिडिया ग्रुप

बारामती : राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत, महाराष्ट्रातील मराठवाडा विदर्भ भागातील 2706 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, याबाबत बोलताना माजी केंद्रीय कृषिमंत्री खासदार शरद पवार म्हणाले, " राज्यातील शेतकऱ्यांची वाढती आत्महत्या ही चिंताजनकच बाब आहे," याबाबत सरकारने माहिती घेऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत योग्य धोरण आखावे, बारामती दौऱ्यावर जेष्ठ खासदार शरद पवार आले असता पत्रकारांनी आज त्यांच्याशी संवाद साधला.

येत्या सोमवारी 17 मार्चपासून संसदीय कामकाज सुरु होत असून या संदर्भात आम्ही लक्ष घालू आवश्यक ते मुद्दे मांडू, असे ही शरद पवार यांनी यावेळी सांगितले, राज्यातील वातावरण धार्मिक स्वरुपाचे होत आहे, होळीचा सण आणि थोर राष्ट्र पुरुषांचा अपमान होताना दिसत आहे, यावर बोलताना शरद पवार म्हणाले, " काहीजण परिस्थितीचा गैरफायदा घेताना दिसत आहेत, राज्य सरकारने याबाबत बघायची भूमिका न घेता राज्याच्या हितासाठी काम करावे.

महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प सादर झालेला आहे, यामध्ये महाराष्ट्रात पूर्वी महाआघाडीचे सरकार असताना दोन लाख कोटीचे कर्ज होते, आज महायुतीच्या सरकारमध्ये राज्यावर साडेनऊ लाख कोटीचे कर्ज होत आहे ?

या प्रश्नाबाबत बोलताना शरद पवार म्हणाले, माझ्याकडे अर्थसंकल्पाच्या प्रती आलेली नाही, ती आल्यानंतर वाचून त्याबाबत अधिक बोलणे उचित ठरेल.

वसंतदादा इन्स्टिट्यूट व कृषी विज्ञान केंद्र बारामती आणि कृषी विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त माध्यमातून ए आय ऊस उत्पादनामुळे उसाच्या धंद्यामध्ये नवीन क्रांती घडेल, यामुळे उसाचा धंदा अधिक सोयीस्कर होण्यास मदत होईल, आम्ही यासाठी बरेच दिवस प्रयत्न करीत होतो, आज महाराष्ट्रातील अनेक साखर कारखाने हे यांच्या सूचनेनुसार हे उसाचे वाण आम्ही तयार करीत आहोत, याला पाणी कमी लागते, साखरेचे उत्पादन चांगले येते, आणि उसाचा धंदा सोयीस्कर होण्यास मदत होते, महाराष्ट्र राज्यातील अनेक साखर कारखाने यामध्ये समाविष्ट होत असून दक्षिण महाराष्ट्रातील बहुसंख्य साखर कारखान्याचे यामध्ये सहभाग राहणार आहे, असे पवार यांनी सांगितले.

# 1 एप्रिलपासून सर्व वाहनांना FASTag बंधनकारक !

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणे : राज्यातील सर्व वाहनांना आता फास्टॅग बंधनकारक करण्यात आला आहे. या संदर्भातील निर्णयाला राज्य मंत्रिमंडळाने काही दिवसांपूर्वीच मंजूरी दिली होती. आता या निर्णयाची अंमलबजावणी 1 एप्रिल 2025 पासून करण्यात येणार आहे. तसेच 1 एप्रिल 2025 नंतर फास्टॅग नसलेल्या वाहनांकडून दुप्पट टोल वसूल केला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता 1 एप्रिलपासून सर्व वाहनांना फास्टॅग असणं अनिवार्य असणार आहे.


महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) द्वारे चालवल्या जाणाऱ्या सर्व टोल प्लाझांवर आता फास्टॅगद्वारे पैसे भरणे बंधनकारक असणार आहे. मात्र, जे वाहनधारक या पद्धतीचा स्वीकार करणार नाहीत, किंवा या पद्धतीने शुल्क भरण्यास असमर्थ असतील तर त्या वाहनधारकांना 1 एप्रिलनंतर दुप्पट टोल भरावा लागणार आहे. दरम्यान, आता फास्टॅग वापरुन टोल भरणे अनिवार्य असल्याची सूचना जारी करण्यात आली असल्याची माहिती एमएसआरडीसीच्या एका अधिकाऱ्याने दिली आहे. टोलची प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यासाठी आणि टोलवरील लागणारा वेळ आणि फास्टॅगचा गोंधळ टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. हा निर्णय भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) निश्चित केलेल्या धोरणांशी आणि रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या निर्देशांशी




सुसंगत असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. राज्य सरकारच्या निर्णयानुसार 1 एप्रिलपासून सर्व वाहनांसाठी फास्टॅग अनिवार्य करण्यात आला आहे. त्यामुळे फास्टॅगविना धावणाऱ्या वाहनांकडून दुप्पट टोल (पथकर) वसूल करण्यात येणार आहे. एमएसआरडीसीसह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व पथकर नाक्यांवर आता 1 एप्रिलपासून फास्टॅग प्रणालीद्वारे पथकर वसुली केली जाणार आहे. त्यामुळे वाहनचालकांनी त्यापूर्वी फास्टॅग स्टिकर खरेदी करून त्याचा वापर सुरु करणे गरजेचे आहे. अन्यथा त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागेल.

# क्राइम पेट्रोलमध्ये अनुप सोनी परतला

शबनम न्यूज मिडिया ग्रुप



सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजन वरील सर्वात लोकप्रिय क्राइम शो पैकी एक क्राइम पेट्रोल पुन्हा सुरु होणार आहे. या नव्या सीझनमध्ये 26 अत्यंत गुंतागुंतीच्या आणि चित्तथरारक हत्या प्रकरण प्रेक्षकांना

खिळवून ठेवतील. ज्यांचे प्रभावी सूत्रसंचलन या कार्यक्रमाशी एकरुप झाले आहे, ते या कार्यक्रमाचे

निवेदक म्हणून पुन्हा पपरतले आहेत. ते त्यांच्या विशेष शैलीद्वारे प्रेक्षकांना गंभीर प्रकरणाबद्दल माहिती देतील, ज्यामुळे विश्वासार्हता व गांभीर्य दिसून येईल.

प्रत्येक प्रकरण जसजसे हळू हळू पुढे जाईल, तसतसा क्राइम पेट्रोलचा नवीन सिझन प्रत्येक वळणावर एक प्रश्न विचारतो- 'आखीर खून किसने किया?' वास्तविक जीवनातील घटनांवर आधारीत या घटना अत्यंत गुंतागुंतीच्या तपासात प्रेक्षकांना खोलवर घेऊन जातात. यातून भयंकर गुन्ह्यांचे धक्कादायक सत्य आणि त्यामागील गुन्हेदारांचा पर्दाफाश होईल.

कार्यक्रमात पुन्हा येण्याबद्दल अनुप सोनी यांनी उत्सुकता व्यक्त केली. ते म्हणाले, "क्राइम पेट्रोल ही मालिका त्याच्या आकर्षक कथनामुळे प्रेक्षकांचा आवडता कार्यक्रम बनला आहे. कार्यक्रमातील खूनांचे रहस्य अधिक गूढ आहे, त्यामुळे नवीन सीझन प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचे वचन देतो, खऱ्या आयुष्यातील घटनांवर आधारीत असा यातील प्रत्येक भाग अत्यंत गुंतागुंतीच्या हत्या प्रकरणांची उकल करुन खऱ्या गुन्हेगाराचा पर्दाफाश करतो. या गुंतागुंतीच्या तपासांत प्रेक्षकांना घेऊन जाणारा सूत्रसंचालक म्हणून मी परत आलो आहे, याचा माला खूप आनंद झाला आहे. नव्या प्रोमोने आधीच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे आणि प्रेक्षकांना हा कार्यक्रम आवडेल, अशी मला खात्री आहे."

सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजन आणि सोनी लिव्हवर क्राइम पोट्रोल पुन्हा सुरु होत आहे.. अत्यंत रहस्यमयी कथांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठी, माहिती देण्यसाठी आणि आकर्षित करण्यासाठी पहात रहा..

# महाराष्ट्रातील तरुणांना बॉलिवूडमध्ये संधी मिळायला हवी : गणेश आचार्य

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

महाराष्ट्रातील तरुणांना बॉलिवूडमध्ये संधी मिळायला हवी. 'पिंटू की पप्पी'मध्ये सुशांत थमके या मराठी मुलाला ब्रेक दिला आहे. त्याच्यामध्ये खूप प्रतिभा आहे. संघर्षातून पुढे आलेला हा तरुण आहे. मराठी तरुणांकडे गुणवत्ता असते. त्यांना योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर ते स्वतःला सिद्ध करतात. अशा संधींचा लाभ घेत मराठी कलाकारांनी चित्रपटसृष्टीत भरीव योगदान



द्यावे," असे मत प्रख्यात कोरिओग्राफर व अभिनेता-दिग्दर्शक गणेश आचार्य यांनी व्यक्त केले.सूर्यदत्त इन्स्टिटयूट ऑफ परफॉर्मिंग आर्टस् च्या वतीने गणेश आचार्य यांच्याशी विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बावधन कॅम्पसमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी 'सूर्यदत्त'चे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणेश आचार्य यांना 'सूर्यदत्त एक्सलन्स अवॉर्ड'ने गौरविण्यात आले, तर अभिनेता सुशांत थमके, अभिनेत्री जाण्या जोशी, विधी यादव यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# सामान्य महिलांसह अनेक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार व्यक्तिमत्व

## डॉ.तृप्ती धनवटे-रामाने

डॉक्टर तृप्ती धनवटे रामाने यांचा जन्म पिंपरी चिंचवड शहरातच झाला, शिक्षण पुणे वाडिया मेडिकल मध्ये पूर्ण केले तर त्यांचे लग्न देखील चिंचवडमध्येच झाले. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर, पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते तसेच या शहराला शैक्षणिक वारसाही आहे. त्यामुळेच तृप्ती या लग्न झाल्यानंतरही शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहिले. आकांक्षा मार्फत कौशल्य शिक्षण क्षेत्रात कार्यरत राहत असताना लहान मुलांना कौशल्य एज्युकेशन तसेच युवकांना शिक्षण देताना महिलांच्या अनेक समस्या त्यांच्या समोर आल्या त्यांचे निरासन त्यांनी प्रत्येक वेळी केले आणि हे सामाजिक काम करता करता डॉक्टर तृप्ती धनवटे यांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात एकूण 30 हजार स्टार्टअप बचत गट सक्षम पणे कार्यरत आहे.

2009 मध्ये आकांक्षा ऑर्गनायझेशन ही संस्था (एनजीओ) कला कौशल्य विकासासाठी त्यांनी स्थापन केली. आज ही संस्था शासकीय, सरकारी संस्था सोबत जोडून अनेक उद्योग आणि व्यवसायाची प्रेरणा बनली आहे. पिंपरी चिंचवड शहर कला आणि सांस्कृतिक तसेच औद्योगिक भूमी आहे हे तृप्ती धनवटे यांना आधीपासूनच माहीत होते त्यामुळे 2017 मध्ये महाराष्ट्र राज्य व्यावसायिक संघटनेच्या अध्यक्षपदाचा त्यांनी पदभार स्वीकारला त्यानंतर त्यांनी जागतिक स्तरावर महाराष्ट्रातील अनेक उद्योग पोहोचविले.

कोरोना काळात बंद पडलेले उद्योग किंवा नवीन नावारुपास येणारे उद्योग यांना पूर्णपणे चालना देत त्यांना जागतिक दर्जा मिळून देण्याचे काम डॉ.तृप्ती धनवटे या करीत आहेत. अनेकांना रोजगार मिळावे यासाठी रोजगार मेळावे ,स्वयंरोजगार मेळावे संपूर्ण महाराष्ट्रात या घेत आहेत आजपर्यंत एकूण 5000 पेक्षा जास्त युवक युवतींना यामार्फत त्यांनी रोजगार मिळवून दिला आहे.

हे सर्व करत असताना त्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न ही त्यांनी वयाच्या 36 व्या वर्षी पूर्ण केले. आधीपासूनच वाडिया कॉलेज मेडिकल मध्ये त्यांनी बी. एम. एल. टी. चे शिक्षण पूर्ण केले होते सध्या त्या नॅचरोपॅथी यामध्ये डॉक्टरची पदवी घेऊन स्कीन,हेअर ,नॅचरोपॅथी थेरपी सेंटर चालवीत आहेत आणि यामध्येच व्यावसायिक दृष्टीकोन ठेवत त्यांची वाटचाल सुरु आहे.

त्यांच्या दूरदृष्टीकोनातून आज महाराष्ट्र राज्य व्यावसायिक संघटनेमार्फत महाराष्ट्रातील उद्योग हे जागतिक स्तरावर पोहोचत आहेत.तसेच आकांक्षा आर्टिस्ट अँड स्किल इन्स्टिट्यूशन मार्फत विद्यार्थ्यांना योग्य उच्च दर्जाचे शिक्षण मिळत आहे. तसेच महिला व युवकांना स्वयंरोजगार आणि रोजगार संधी त्यांच्यामार्फत उपलब्ध होत आहेत.

त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये सावित्रीबाई फुले पुरस्कार, इंडियन वूमन हिस्ट्री अवॉर्ड, राजस्थान गव्हर्नमेंट ग्लोबल ट्वेंटी एशियन आफ्रिका वुमन अवॉर्ड, नारी भूषण पुरस्कार, असे अनेक पुरस्कार त्यांना आजपर्यंत मिळाले आहेत. त्यांच्या या कार्यक्षम कौशल्यपूर्वक सक्षम कार्याची दखल घेत शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने आदर्श नारी पुरस्कार डॉ. तृप्ती धनवटे रामाने यांना देण्यात येत आहे.















आदर्श नारी पुरस्कार 2025

## डॉ.तृप्ती धनवटे-रामाने

MD/संस्थापक- आकांक्षा ऑर्गनायझेशन

CEO - आकांक्षा इंटरनॅश्नल आर्टिस्ट एंड स्किल स्कूल

अध्यक्ष- महाराष्ट्र राज्य व्यावसायिक संघटना.

## संपादकीय

# सक्षम महिला, सुरक्षित महिला

**पुण्यातील स्वारगेट भागात तरुणीवर झालेला बलात्कार! बोपदेव घाटात मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर बलात्कार! शरीरसुखासाठी नकार दिल्याने महिलेवर कटरने वार! या सर्व घटनेवरुन साहजिकच एखादी महिला सुरक्षित आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. मात्र या सर्व घटनेचा निकष काय? विश्वास संपादन करुन कोणी व्यक्ती महिलेवर अत्याचार करत असेल तर महिला या अनोळखी व्यक्तीवर विश्वास कसे ठेवता? आताच्या सुशिक्षित महिलेला काही वाईट होण्याचा अंदाज येत नाही का?**



पुण्यात स्वारगेट बस स्थानकावर एका अनोळखी व्यक्तीने विश्वास संपादन करुन बस मध्ये तरुणीला नेऊन तिच्यावर बलात्कार केल्याची घटना घडली होती. दुसरे म्हणजे बोपदेव घाटात आपल्या मित्रांसोबत गेलेल्या तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याची घडला घडली आणि तिसरे म्हणजे शरीरसुखासाठी नकार दिल्याने आरोपीने महिलेवर कटरने वार केल्याची घटना घडली. मुद्दा हा कि, या सर्व घटना घडल्या तेव्हा तरुणीने किंवा महिलांनी अनोळखी व्यक्ती किंवा त्या व्यक्तीवर विश्वास कसा दाखवला? या सर्व घटना विश्वास संपादन करुन घडल्या होत्या. यावरुन सहाजिकच समजते की, महिला या लगेचच अनोळखी व्यक्तीवर विश्वास दाखवितात, यामुळेच अशा घटना घडतात. सध्याची स्त्री ही सुरक्षित नाही मात्र, सुशिक्षित आहे. महिला या शिक्षित असूनही अशा घटना घडणे हे दुर्दैवी आहे 2022 च्या सरकारी आकडेवारीनुसार, भारतातलं बलात्काराचं प्रमाण किती आहे माहितीये? भारतात 2022 मध्ये 31,516 गुन्हे नोंद झाले. म्हणजेच दिवसाकाठी 86 गुन्ह्यांची नोंद आहे. एकट्या पुण्यात 2023 मध्ये बलात्कार आणि विनयभंगाचे 410 आणि 2025 मध्ये 500 गुन्हे नोंद झाले आहेत. पण यातही सगळ्या महिला तक्रार करण्यासाठी पुढे येतील असं नाही. काही लोकांच्या मते अशा घटना रिपोर्ट होण्याचं प्रमाण फक्त 5 ते 6 टक्के आहे.

पुण्यातील स्वारगेट भागात घडलेल्या घटनेमुळे अनेक तर्क-वितर्क लावण्यात आले. बस मध्ये तरुणीसोबत अत्याचार होत असताना ती ओरडली कशी नाही? किंवा तिने त्या व्यक्तीवर विश्वास करून बस मध्ये चढली कसं काय? तिने त्या व्यक्तीचा विश्वास कशा प्रकारे केला? या सर्व प्रश्नांना उत्तर अजूनही मिळालेले नाही किंवा असे बरेच प्रश्न उपस्थित होत आहे. दुसरे म्हणजे बोपदेव घाटात घडलेली घटना या घटनेमध्ये मुली रात्रीचे बाहेर फिरतात म्हणून असे प्रकार घडतात, तसेच मुलींनी इतक्या रात्रीच बाहेर जायचं कशाला? मुलांवर विश्वास दाखवायचाच कशाला? असे अनेक प्रश्न या घटनेमुळे उपस्थित झाले.

त्याच प्रमाणात तिसरी घटना म्हणजे एखादी व्यक्ती वारंवार त्रास देत असेल तर ते सहन न करता आपल्या कुटुंबांना किंवा मित्र-मैत्रिणींना सांगणे गरजेचे होते. एखादी व्यक्ती शरीर सुखासाठी आपल्याला त्रास देत असेल तर त्याच्या विरुद्ध भूमि का घेणे गरजेचे आहे.

तसेच एका महिलेवर कटरने वार केल्याची घटना सध्या चर्चेत आहे, या घटनेमध्ये महिलेने आपल्या कुटुंबांना या अगोदरच कल्पना कशी दिली नाही किंवा त्या व्यक्तीच्या विरोधात भूमिका कशी घेतली नाही, या व्यक्तीच्या बाबत कोणाला कसे सांगितले नाही, जर याची कल्पना कोणा दुसऱ्याला असती तर महिलेवर कटरने वार झालेच नसते, असे अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत.

सध्याची स्त्री सुरक्षित नाहीच मात्र, सुशिक्षित तर आहे. प्रत्येक दोष हा प्रशासनावर तसेच शासनावर देता येणार नाही. महिला या आता शिक्षित झाल्या आहेत, शिक्षित महिला जरी अशा व्यक्तींवर विश्वास दाखवीत असेल तर हे अत्यंत दुर्दैवी बाब आहे.सुशिक्षित महिला असूनही कोणावर विश्वास दाखविणे अत्यंत दुर्दैवी झाले आहे, महिला या कशा प्रकारे कोणावर विश्वास दाखवून त्यांच्यासोबत बाहेर जाऊ शकतात किंवा एका शांततेच्या ठिकाणी जाऊ शकता किंवा याची कल्पना कुटुंबांना न देता त्या व्यक्तीवर विश्वास दाखवू शकतात असे अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, सध्याची महिलाही सुशिक्षित असल्याने एखादी सुशिक्षित महिला असूनही एखाद्या व्यक्तीवर विश्वास कशाप्रकारे दाखवू शकते यावर प्रश्न उपस्थित होत आहे.एखाद्या स्त्रीवर असा प्रसंग ओढावाला तर जागीच अशा नराधमाला ठेचून काढायला हवे अशी भूमिका प्रत्येक महिलेने घ्यायला हवी. तसेच सक्षम व आधुनिक युगातील महिला म्हणून जर आपल्याला जगासमोर उभारायचं असेल तर अशा घटना घडण्यापूर्वीच या घटनांना आळा घालण्याची ताकद प्रत्येक महिलेचा असायला हवी.

महिलांनी स्वतः सक्षम असणे महत्त्वाचे आहे. तसेच एखाद्या व्यक्तीविरोधात कठोर भूमिका घेण्यात देखील आवश्यक आहे. या सर्व घटनांना आळा घालण्यासाठी महिलांनी स्वतः विरोधात जाण्याची भूमिका ठेवणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणात शासनाने देखील महिलेला सक्षम करण्यासाठी योग्य ती भूमिका घेणे आवश्यक आहे. लाडकी बहीण नाहीतर बहिणीला सक्षम करणे गरजेचे आहे. महिला सुरक्षिततेसाठी महिलांनी सक्षम होण्याची गरज आहे उदाहरणार्थ धाडस प्रत्येक महिलेत असायलाच हवे तसेच स्वरक्षणाचे धडे प्रत्येक महिलेने घ्यायलाच हवे, राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांचा आदर्श आपल्यासमोर आहे यांनाही अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले परंतु या डगमगल्या नाहीत यांचा आदर्श घेऊनच प्रत्येक महिलेने पुढे जावे असेच या लेखाच्या माध्यमातून सांगण्याचा उद्देश आहे.

## सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त कार्यक्षम महिलांचा प्रातिनिधिक सन्मान

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप




पिंपरी जागतिक महिलादिन आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त ज्येष्ठ नागरिक संघ, चिंचवडच्या वतीने समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उषा गर्भे आणि नीलम तुपे यांचा ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ यांच्या हस्ते विरंगुळा केंद्र, पागेच्या तालमीसमोर, चिंचवडगाव येथे सोमवार, दिनांक 10 मार्च 2025 रोजी हृद्य सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे सन्मानाचे स्वरुप होते. माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडे, ज्येष्ठ नागरिक संघ, चिंचवडचे अध्यक्ष रमेश इनामदार, उपाध्यक्ष चंद्रकांत कोष्टी, कार्यवाह राजाराम गावडे, संचालक नंदकुमार मुरडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन आणि त्रिवार ओंकार करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. रमेश इनामदार यांनी प्रास्ताविकातून स्त्रीशक्तीला वंदन करून ज्येष्ठ नागरिक संघ, चिंचवडच्या माध्यमातून चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. वृषाली मरळ यांनी ज्येष्ठ नागरिक संघ, चिंचवड या संस्थेची शिस्त अन् उपक्रमशीलता याविषयी गौरवोद्गार काढले; तर अश्विनी चिंचवडे यांनी आधुनिक काळात महिलांनी आधुनिकतेची कास धरावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. सत्काराला उत्तर देताना उषा गर्भे यांनी, 'स्त्रियांच्या विविध नात्यांनी समाज समृद्ध झालेला आहे. ज्येष्ठ महिलांनी किमान एकतरी छंद जोपासावा!' असे मत व्यक्त केले; तर नीलम तुपे यांनी समाजकार्य हा आवडीचा विषय असल्याचे नमूद केले. यावेळी महापालिका सेविका संगीता जगताप यांचा सत्कार करण्यात आला; तसेच उपस्थित महिला सदस्यांना भेटवस्तू देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

सन्मान प्रसंगी श्यामकांत खटावकर यांनी शंखनाद केला. मंदाकिनी दीक्षित, मंगला दळवी, अलका इनामदार, नीलिमा कांबळे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला.

नंदकुमार मुरडे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. डॉ. सरला जोशी यांनी कवितावाचन केले. संघाच्या महिला सदस्यांनी कार्यक्रमाच्या संयोजनात विशेष परिश्रम घेतले. रत्नप्रभा खोत यांनी सूत्रसंचालन केले. रेवती कुलकर्णी यांनी आभार मानले. सामुदायिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पोलिसांनी एकूण ६६ अफूची झाडे केली जप्त

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप



लोणी काळभोर पोलिसांनी आळंदी म्हातोबाची येथे अफूच्या झाडांची बेकायदेशीर लागवड करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध मोठी कारवाई केली आहे. 14 मार्च 2025 रोजी दुपारी 3 च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या वेळी पोलिसांनी 40 हजार रुपये किंमत असलेली आणि 4 किलो वजनाची एकूण 66 अफूची झाडे जप्त केली.

लोणी काळभोर पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आळंदी म्हातोबाची गावातील जगताप मळा रोडच्या कडेला असलेल्या नितीन टिंबळे यांच्या प्लॉटिंगच्या मागील भागात अफूची लागवड करण्यात आली आहे.

ही लागवड विक्रीच्या उद्देशाने करण्यात आल्याची शक्यता असल्यामुळे पोलिसांनी तातडीने कारवाई करण्याचे ठरवले. पोलीस उपनिरीक्षक अनिल जाधव यांच्या नेतृत्वाखाली दोन पंचांसह पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला असता गट नंबर 775 मध्ये मोठ्या प्रमाणावर अफूची झाडे आढळून आली. एकूण 66 झाडे मिळून आली असून, त्यांचे एकूण वजन 4 किलो एवढे आहे. या झाडांची बाजारातील किंमत सुमारे 40 हजार रुपये असल्याचे सांगितले जात आहे.




## यश मिळेपर्यंत प्रयत्न सोडू नका : शरमन जोशी

### 'एमआयटी एडीटी'च्या 'पर्सोना महोत्सवा'चा समारोप

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप



पुणेः आयुष्य प्रचंड आव्हानात्मक आहे. मात्र आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटाला 'ऑल इज वेल' म्हणत विद्यार्थ्यांनी धीराने तोंड द्यायला हवं. यासह, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र ओळखून त्यात करिअर करायला हवं. आवडीचे क्षेत्र ठरल्यानंतर परिणामाची चिंता न करता 'नेवर गिव अप' वृत्ती स्विकारुन यश मिळेपर्यंत प्रयत्न सोडू नका आणि यश प्राप्तीनंतर त्यात झोकून देऊन आपले सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करा.

या प्रक्रियेत ज्या गोष्टी आपल्या हातात आहेत, त्यांचाच विचार करावा व ज्या नाहीत त्यांची चिंताच करु नका, असे आवाहन प्रसिद्ध सिनेअभिनेते शरमन जोशी यांनी मांडले.

ते एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या सातव्या 'पर्सोना फेस्ट-25' या वर्षातील सर्वांत मोठ्या कला महोत्सवाच्या समारोपात बोलत होते. याप्रसंगी, शरमन यांच्या पत्नी प्रेरणा चोप्रा-जोशी, 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड, विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. राजेश एस., प्र.कुलगुरु डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ.सुदर्शन सानप, डॉ.विपुल दलाल, डॉ.रेणू व्यास, डॉ.सुराज भोयार आदी उपस्थित होते.

याप्रसंगी शरमन जोशी यांनी त्यांच्या 'थ्री इडियट्स' या त्यांच्या प्रसिद्ध चित्रपटातील 'गिव मी सम सनशाईन' या गाण्यातील कवितेच्या ओळी म्हणत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. 'थ्री इडियट्स' या चित्रपटातील विचाराप्रमाने एमआयटी एडीटी विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी प्रयत्नशील आहे, असे म्हणत त्यांनी सर्वांचे तोंडभरून कौतुक देखील केले. प्रा.डॉ.कराड म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना 2009 साली अमीर खान व शरमन जोशी यांचा सहभाग असणारा, 'थ्री इडियट्स' हा अतिशय सुंदर सिनेमा पाहण्यात आला. त्या सिनेमात देण्यात आलेल्या संदेशा प्रमाणे विद्यार्थ्यांना कला, डिजाईन आणि तंत्रज्ञान यांचा संगम असणारे व त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्याचे शिक्षण देणारे एखादे विद्यापीठ असावे, अशा विचाराने एमआयटी एडीटी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली, असे ते शरमन जोशी यांना उद्देशून म्हणाले. तसेच, पर्सोना सारखे महोत्सव विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहन देणारे तथा त्यांच्यातील कलेचा साक्षात्कार करुन देणारे उत्तम व्यासपीठ असल्याचेही त्यांनी नमूद केले.विश्वशांती प्रार्थनेने सुरु झालेल्या या कार्यक्रमाची सांगता, पसायदानाने करण्यात आली. ज्याचे, प्रास्ताविक डॉ.सुराज भोयार यांनी तर आभार, डॉ.सुदर्शन सानप यांनी मानले.

**वर्षातील सर्वोत्तम 'पर्सोनां'चा गौरव**

पर्सोना महोत्सवाच्या समारोप प्रसंगी, विद्यापीठात वर्षभरात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा 'बेस्ट पर्सोना ऑफ द इअर' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यामध्ये तन्वी बोगाडे, अनुष्का जोशी, शिवनेश मोरे, मृण्मयी गोडमाने, सौरेश जबे, तेजस डोंगरे, अक्षत वशीष्ठ, धीर जैन, ओंकार शिंदे, अमोघा पाठक, राहुल देवगावकर, कॅडेट हरमनदीप कौर, आर्या पाटणकर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. यासह, 'एमआयटी एडव्हेंचर क्लब'ला वर्षातील सर्वोत्तम क्लब म्हणून गौरविण्यात आले.

www.shabnamnews.in
संपूर्ण महाराष्ट्रातील बातमी एका क्लिक वर
SHABNAM NEWS
शबनम न्यूज
मराठी वृत्तपत्र,वृत्तवाहिनी, मराठी न्यूजपोर्टल
विश्वसनीय वृत्तसंस्था
दिनांक 16/03/2025
आदर्श नारी पुरस्कार विशेषांक

## पिंपरी चिंचवड शहराच्या आम आदमी पक्षाच्या शहराध्यक्षा

# सौ.मिना चंद्रमणी जावळे

आदर्श नारी पुरस्कार 2025


















पिंपरी चिंचवड शहराच्या आम आदमी पक्षाच्या शहराध्यक्षा सौ.मिना चंद्रमणी जावळे, पहिल्यापासूनच सामाजिक कार्याची आवड तसेच शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची आवड त्यामुळे दहावीनंतर बालवाडी शिक्षिकेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला व देहूरोड येथे बालवाडी शिक्षकांमधून काम केले, त्यानंतर आकुर्डी येथे माजी नगरसेवक शंकरराव पांढरकर यांच्या मार्गदर्शनात आदर्श शाळा येथील शाळेत बरीच वर्षे शैक्षणिक क्षेत्रात कार्य ,यादरम्यान पालक मेळावा ,सामाजिक,धार्मिक कार्यात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. लग्नानंतर त्यांचे पती आदर्श क्रीडाशिक्षक चंद्रमणी जावळे यांच्या सोबत गेली 35 वर्षापासून पिंपरी चिंचवड शहरात सामाजिक धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी, महिला बचत गटांची स्थापना या माध्यमातून महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे तसेच शासनाच्या अनेक योजना महिलांपर्यंत पोहोचून त्याचा लाभ अनेक महिलांना मिळवून देणे असे अनेक सामाजिक कार्य त्यांनी केले आहे.

सामाजिक काम करत असतानाच राजकीय क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली,पिंपरी चिंचवड शहरात आम आदमी पार्टी पक्षाच्या वतीने त्यांनी आपला राजकीय प्रवास सुरु केला सध्या त्या आम आदमी पक्षाच्या शहराध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत.आम आदमी पक्षाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहरातील अनेक प्रश्नांवर त्यांनी आंदोलनात सहभाग घेतला. शासनाच्या चुकीच्या कारभारावर अनेक वेळा प्रश्न उपस्थित केले. पिंपरी चिंचवड शहरात आम आदमी पार्टी हा पक्ष वाढविण्यासाठी त्या प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहेत. या माध्यमातून समाजकार्य व राजकारण करत त्यांनी आपला नावलौकिक मिळविला आहे. ज्येष्ठ नागरिक.महिला. लहान बालके. युवक ,युवती यांच्यासाठी सामाजिक,शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात त्या उल्लेखनीय कार्य करीत आहेत. बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावे यासाठी त्यांनी अनेक नोकरी महोत्सव सारखे उपक्रम राबविले तसेच आरोग्य शिबिर, नेत्र तपासणी शिबिर अशा प्रकारच्या आरोग्य विषयीच्या उपक्रमात त्यांनी हिरीरीने सहभाग घेतला.आपले राजकीय व सामाजिक कार्य करत असताना त्यांनी पत्रकारांचाही सन्मान केला पत्रकार दिनानिमित्त त्यांनी अनेक पत्रकारांना सन्मानित केले.तसेच पत्रकारांच्या अनेक अडी अडचणी समजून घेतल्या .या सर्व सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यात त्यांना त्यांचे पती क्रीडा शिक्षक चंद्रमणी जावळे यांची साथ मिळते आहे. आणि त्यामुळेच त्यांनी आपल्या या सामाजिक कार्याने व राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याने समाजात आदर्श निर्माण केला आहे त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेत त्यांना शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने दिला जाणारा आदर्श नारी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

## सामाजिक कार्याने प्रभावित करणारं व्यक्तिमत्व

# सौ.पुनम संतोष म्हस्के

आदर्श नारी पुरस्कार 2025



सौ पुनम संतोष म्हस्के यांचे एम.कॉम. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले आहे सामाजिक कार्याची आवड प्रथम पासूनच असल्याने त्यांचे पती संतोष म्हस्के यांनी त्यांना अनेक संधी उपलब्ध करुन दिल्या. या संधीच्या माध्यमातून त्यांनी महिला बचत गटांची स्थापना केली. महिला स्वावलंबी व्हाव्या याकरिता त्या नेहमी प्रयत्नशील असतात. अनेकांच्या सुखदुःखात सामील होणे, त्यांना भरीव मदत करणे यासाठी त्या नेहमी अग्रेसर असतात. सामाजिक कार्य करत असताना समाजाचा जर विकास करायचा असेल तर राजकारणात असायला हवे असे म्हटले जाते त्यामुळेच पूनम संतोष म्हस्के या भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आपले राजकीय प्रवास करत आहेत,या राजकीय प्रवासातून त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या वतीने अनेक उपक्रम राबविले,त्या आगामी होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. त्यांना विकास नगर, किवळे भागातून मोठ्या प्रमाणात नागरिकांचा पाठिंबा आहे.त्यांनी या परिसरातील नागरिकांसाठी अनेक सामाजिक कामे केली आहेत तसेच प्रभागात असणाऱ्या सर्व कुटुंबाशी त्यांनी आपुलकीचे नाते जोडले गेले असल्याने त्यांना आगामी राजकीय प्रवास सोयीस्कर झाला आहे. आपण समाजासाठी काहीतरी देणे लागतो या भावनेतून पिंपरी चिंचवड शहरातील विकास नगर,किवळे,रावेत ,मामुर्डी परिसरात आपल्या सामाजिक कार्याचा वारसा चालवीत आहेत. या करीता त्यांना त्यांचे पती संतोष म्हस्के यांचा भक्कम पाठिंबा मिळतो.महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांची स्थापना त्या माध्यमातून महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे , प्रभागातील नागरिकांसाठी अनेक आरोग्य शिबीरे यासोबतच दिव्यांगाना भरीव मदत बेरोजगार युवक युवतींना रोजगार उपलब्ध करून देणे सण समारंभ साजरी करणे आणि या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविणेआपले राष्ट्रीय सण तसेच पारंपारिक सण व महापुरुषांच्या जयंती या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करून अनेक सामाजिक उपक्रम त्यांनी राबविले आहेत या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात या यशस्वी झाल्या आहेत तसेच अनेक महिला बचत गटांना शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या योजना त्या महिलांपर्यंत पोहोचत आहेत व त्या योजनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक महिलांना लाभ मिळवून दिला आहे.आपल्या सामाजिक कार्याने त्यांनी अनेकांना प्रभावित केले आहे समाजात एक आदर्श निर्माण केला आहे.











## बोपखेल गावात प्रथम महिला विणेकरी होण्याचा मान

# श्रीमती मालन बबनराव घुले



पिंपरी चिंचवड शहरातील बोपखेल गावात प्रथम महिला विणेकरी होण्याचा मान श्रीमती मालन बबनराव घुले यांना मिळाला आहे. विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ च्या त्या सदस्य म्हणून कार्यरत आहेत.या भजनी मंडळाच्या माध्यमातून महिला पांडुरंगाच्या मंदिरात नेहमी भजन, कीर्तन करीत असतात, अनेक कीर्तन महोत्सवात त्यांनी सहभाग घेतला आहे, भजनी मंडळात खजिनदार म्हणूनही त्यांनी काम केले आहे. श्रीमती मालन घुले व त्यांचे पती बबनराव घुले यांनी सलग पंधरा वर्षे पायी वारी केली आहे. 2012 मध्ये त्यांच्या पतीचे निधन झाल्यानंतर त्यांनी ही पायवारी थांबविली नंतर गावातील सार्वजनिक किर्तन, भजन अशा कार्यक्रमात त्यांनी नेहमी हजेरी लावली.सप्ताह, चंपाषष्ठी, तुळशी विवाह अशा विविध धार्मिक कामात त्यांचा नेहमी सहभाग राहिला आहे. श्रावण महिन्यात वीणा त्यांच्याकडेच असते गावातील सर्वांबरोबर त्या मिळून मिसळून राहतात. आपल्या घरात त्या ज्येष्ठ आहेत त्यांचे वय 84 असूनही त्यांनी आपल्या सर्व घराची जबाबदारी आजपर्यंत सांभाळली आहे. त्यांच्या कुटुंबात तीन मुले, तीन सुना, पाच नातू एक नातं असा एकंदरीत परिवार आहे.घरातील सर्वजण गुण्यागोविंदाने नांदतात.राहतात, भजन कीर्तन याची पहिल्यापासूनच आवड असल्याने त्या आजही अनेक धार्मिक व सार्वजनिक कार्यात सहभाग घेत असतात त्यांना त्यांच्या या कार्याबद्दल स्वामी समर्थ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

आदर्श नारी पुरस्कार 2025

## मंगळवार पेठेतील जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवना साठी त्वरित द्यावी

### समितीची केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे मागणी



मंगळवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या भावी विकास व योजनेसाठी आरक्षित जागा खासगी बिल्डरला देण्याचा निर्णय दुर्दैवी आहे. हा करार रद्द करून सदरची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या विस्तारासाठी त्वरित द्यावी, अशी मागणी दलित, बहुजन व आंबेडकर अनुयायांची आहे. सामाजिक हिताच्या दृष्टीकोनातून या संवेदनशील व महत्वपूर्ण जागेचा प्रश्न मार्गी लावून डॉ. आंबेडकर भवनाचे विस्तारीकरण करण्यात पुढाकार घ्यावा, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण समितीने केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे केली आहे.

SHABNAM NEWS
# शबनम न्यूज
मराठी वृत्तपत्र,वृत्तवाहिनी, मराठी न्यूजपोर्टल
विश्वसनीय वृत्तसंस्था
दिनांक 16/03/2025
आदर्श नारी पुरस्कार विशेषांक

## थेरगाव परिसरातील महिलांचे एक सक्षम नेतृत्व

# » सौ.सोनाली संदिप गाडे



आदर्श नारी पुरस्कार 2025

पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव परिसरात भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग क्रमांक 23 मधील महिला अध्यक्ष तथा रोटरी क्लब थेरगावच्या संचालिका त्यांचे शिक्षण बीएपर्यंत झाले आहे. सौ सोनाली संदीप गाडे या थेरगाव परिसरात महिलांचे एक सक्षम नेतृत्व म्हणून नावारूपास आले आहेत त्यांचे पती माजी स्वीकृत नगरसेवक संदीप गाडे यांच्या खांद्याला खांदा लावून सामाजिक कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतल्यासारखे काम करत आहेत प्रभागातील महिलांच्या अडीअडचणीला त्या स्वतः धावून जातात तसेच सर्वांच्या सुखदुःखात सामील सामील होणे यामुळे थेरगाव परिसरात सर्व कुटुंबांशी त्यांचे आपुलकीचे नाते जोडले गेले आहे. सामाजिक कार्याची आवड त्यामुळे गेली 18-20 वर्षे पती स्वीकृत नगरसेवक संदीप गाडे यांच्याबरोबर राजकारणात सक्रिय सहभाग आहे. विशेष करून महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव देता यावा त्यांना एक संधी प्राप्त व्हावी यासाठी दरवर्षी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करीत असतात त्यामध्ये रांगोळी स्पर्धा,मेहंदी, स्पर्धा, आरी वर्क क्लासेस, तसेच लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, पतंग फेस्टिवल्स आरोग्य शिबिर,रक्तदान शिबिर, डोळे चेकअप, व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, अस्थिरोग तज्ञ,श्री रोग तज्ञ,यांचे मार्गदर्शन fastrack वाटप,आयुष्यमान भारत कार्ड वाटप, अंध विधवा महिलांसाठी संजय गांधी ची योजना पेन्शन चालू करणे ,समाजकार्याची आवड असल्यामुळे जागतिक लेवलची रोटरी क्लब संस्था थेरंगाव मध्ये स्थापन करणे थेरगाव रोटेरी क्लब यांच्या नावाने त्याच्या माध्यमातून समाजकार्य करत राहणे रोटरी क्लबच्या माध्यमातून शाळेमध्ये ई लर्निंग किट वाटप दहावीच्या मुलांना मार्गदर्शनपर शिबिरे, महिलांसाठी बचत गट स्थापना करून तो चालवण्यासाठी मार्गदर्शन करणे गोरगरीब जनतेतील लहान मुलांना शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी त्या मुलांसाठी प्रयत्न करणे असे कार्यक्रम घेत असतात ,बचत गटाच्या माध्यमातून महिलांना एकत्र आणून अनुदान मिळवून देण्याचे कामही सोनाली गाडे यांच्या मार्फत होत आहेत ,आरोग्य शिबिरे, हळदी कुंकू, खेळ पैठणीचा, स्वच्छता अभियान असे कार्यक्रमही घेत असतात तसेच 15 ऑगस्ट 26 जानेवारी असे राष्ट्रीय सण देखील उत्साहात साजरे केले जातात सरकारच्या ज्या काही योजना असतील त्या सर्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कामही करत असतात स्मार्ट कार्ड,आयुष्यमान कार्ड लोकांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्यांना मतदान कार्ड काढून देणे व त्यांची मतदान नोंदणी करून घेणे यासारखी कामे त्यांच्या मार्फत विनामूल्य केली जातात.त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने दिला जाणारा आदर्श नारी पुरस्कार सौ. सोनाली संदीप गाडे यांना देण्यात येत आहे











## पारंपारिक सण,सामाजिक उपक्रमातून महिलांचे संघटन

# - सौ.प्रिती संजय मराठे

कार्यकारी विशेष अधिकारी म्हणून कार्यरत, सामाजिक कार्याची आवड असल्याने मागील 18 वर्षापासून सामाजिक कार्यात सातत्याने अग्रेसर आहेत.चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे लोकनेते स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांच्या प्रेरणेने व आता आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनात सौ. प्रीती संजय मराठे आपले सामाजिक कार्य करीत आहेत लहान मुलांना बालगोपाळांना आपल्या संस्कृतीची माहिती व्हावी व तसेच संस्कार द्यावे याकरिता आपल्या पारंपारिक सण या निमित्ताने बालगोपाळांना ते एकत्र आणतात व सण साजरी करतात तसेच होळीच्या निमित्ताने महिलांना होळीच्या संस्कृतीची माहिती मिळावी यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले आहे याचबरोबर वटपौर्णिमेच्या निमित्ताने सावित्रीची माहिती देऊन वटवृक्षाचे पूजन त्या दरवर्षी करत असतात तसेच दरवर्षीप्रमाणे आळंदीवरुन पुण्याला जाणाऱ्या पालखीमध्ये माऊलींचे दर्शन घेऊन वारकऱ्यांना फळे आणि पाणी दरवर्षी वाटप करतात. महिलांमध्ये प्रसिद्ध असलेले बाई पण भारी देवा हा चित्रपट त्यांनी महिलांसाठी मोफत उपलब्ध करून दिला. सौ प्रीती संजय मराठे यांच्या संकल्पनेतून नवी सांगवीत नागपंचमी उत्साहात साजरी झाली. नवरात्र उत्सवात महिलांना एकत्रित आणण्याचे काम सौ. प्रीती संजय मराठे या नेहमी करत असतात. नवरात्री निमित्ताने विविध उपक्रम त्यांच्या वतीने राबविले जाते. तसेच महिलांसाठी महाभोंडला या कार्यक्रमाचे नेहमी आयोजन करतात हळदी कुंकवाचा कार्यक्रम या दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा करतात.महिला बचत गटांच्या माध्यमातून अनेक महिलांना रोजगार संधी उपलब्ध करून देणे पारंपारिक सण साजरी करून यात महिलांना सहभागी करून महिलांचे संघटन वाढविणे, अनेकांच्या सुखदुःखात सहभाग घेऊन मदत करणे, राम मंदिर स्थापनेच्या दिवशी प्रीती संजय मराठे यांच्या मार्गदर्शनात श्रीराम लक्ष्मण व सीता माता व पवनपुत्र हनुमान यांची वेशभूषा परिधान करून सर्व महिला व बालकांनी काढलेली रॅली उल्लेखनीय ठरली त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेत मीडिया ग्रुप वतीने दिला जाणारा आदर्श नारी पुरस्कार सौ प्रीती संजय मराठे यांना देताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे

आदर्श नारी पुरस्कार 2025













## आरोपींची पोलिसांनी काढली धिंड !




पिंपरी चिंचवड: मोशी मध्ये दोन टोळक्यांनी काही वाहनांची तोडफोड केली होती. याप्रकरणी भोसरी एम.आय.डी.सी पोलिसांनी नऊ जणांना अटक केली आहे. नागरिकांमधील भीतीच वातावरण कमी करण्यासाठी या नऊ जणांची घटनास्थळावरून धिंड काढण्यात आली. बुधवारी रात्री दहाच्या सुमारास मोशी मध्ये दोन टोळक्यांमध्ये झालेल्या वादातून दोन ते तीन वाहनांची तोडफोड करण्यात आली होती.बुलेट च्या आवाजावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर हाणामारीत झालं होतं. पैकी, काही जणांनी मोठा दगड घेऊन दुचाकी वाहनांची तोडफोड केली होती.

या घटनेनंतर भोसरी एम.आय.डी.सी पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. अवघ्या काही तासांमध्ये आरोपींचा शोध घेऊन बेड्या ठोकल्या. आरोपींची घटनास्थळावरून धिंड काढण्यात आली.

## इंद्रायणी नदीत बुडून तिघांचा मृत्यू

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी- चिंचवड: मावळमधील किन्हई गावाजवळील इंद्रायणी नदीत बुडून तिघांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व जण पिंपरी-चिंचवड शहरातील घरकुल येथील राहणारे आहेत. ही घटना आज दुपारी तीनच्या सुमारास घडली. पाच मित्र पोहायला गेले होते.

पैकी, तिघांचा पोहताना दम लागल्याने मृत्यू झाला आहे. अशी माहिती देहूरोड पोलिसांनी दिली आहे. धुळवडीच्या दिवशी घटना घडल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.रोहित उर्फ गौतम कांबळे, विशाल उर्फ राज दिलीप आचमे आणि आकाश विठ्ठल कोरडे अशी मृत्यू झालेल्या तरुणांची नाव आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रोहित, आकाश आणि विशाल हे इतर दोन मित्रांसह मावळमधील किन्हई गावाजवळील इंद्रायणी नदीत पोहण्यासाठी गेले होते.

तिघेजण पाण्यात उतरले. इतर दोघेजण नदीच्या कडेला बसले होते. पोहत असताना तिघांना दम लागला आणि ते बुडाले.

तिघेही दिसत नसल्याने इतर दोन्ही मित्रांनी आरडाओरडा केला. पोलीस, अग्निशमन दल आणि एन.डी.आर.एफ आणि ग्रामस्थ घटनास्थळी पोहोचले. अथक प्रयत्नांनंतर दोन तासांनी त्यांचा मृतदेह हाती लागला. धुळवडीच्या दिवशी घटना घडल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

घटनस्थळी मावळ वन्यजीव रक्षक टीमदेखील दाखल झाली होती. घटनेचा अधिक तपास देहूरोड पोलीस करत आहेत.

## हास्यरंगात श्रोते चिंब

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी : नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ आणि तीर्थस्वरूप ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक 14 मार्च 2025 रोजी तीर्थस्वरूप ज्येष्ठ नागरिक संघ, पेठ क्रमांक 29, रावेत येथे आयोजित केलेल्या 'रंगात रंगुनी साऱ्या...' या विनोदी, विडंबन कविसंमेलनात श्रोते हास्यरंगात चिंब झाले. माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते; तसेच ज्येष्ठ एकपात्री कलाकार आनंद मुळूक, श्री संत तुकाराममहाराज सहकारी साखर कारखाना संचालक चेतन भुजबळ, कामगार नेते हेमंत कोयते, ह. भ. प. किसनमहाराज चौधरी, नवयुगचे कार्याध्यक्ष प्रा. तुकाराम पाटील, संचालक प्रा. पी. बी. शिंदे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.मोरेश्वर भोंडवे यांनी,



'कवितांनी आज आनंद दिला. आईवडील हयात नसल्याने कोणत्याही ज्येष्ठ व्यक्तींमध्ये मी त्यांचे रूप पाहतो!' अशी हृद्य भावना व्यक्त केली. चेतन भुजबळ यांनी, 'लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नांतून पुण्याचा सांस्कृतिक वारसा आता पिंपरी - चिंचवडमध्ये रुजतो आहे!' असे मत व्यक्त केले.

आनंद मुळूक यांनी "मोबाइलनं येडं केलंया..." या कवितेच्या माध्यमातून मोबाइलच्या अतिवापरावर मार्मिक भाष्य केले. याप्रसंगी डायलिसिसचे उपचार घेणारे ज्येष्ठ कवी बाबू डिसोजा आणि कवितेच्या निस्सीम प्रेमापोटी व्हीलचेअरवरून आलेल्या मंगला पाटसकर; तसेच कार्यक्षम मुख्याध्यापिका वंदना इन्नाणी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

साप्ताहिक शबनम न्यूज बातमीपत्र मालक मुद्रक प्रकाशक सय्यद रफिक हुसेन व संपादिका शबनम सय्यद यांनी सनशाईन ग्राफिक्स डिझाईन प्रिंटिंग प्रेस येथे छापून 16 नंबर बस स्टॉप जवळ थेरगाव पिंपरी चिंचवड पुणे-33 येथून प्रकाशित केले आहे सदर बातमी मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही (न्याय कक्षा पुणे न्यायालय) अधिक माहितीसाठी संपर्क 9075624359 / 7218327321
Email - shabnamnews2015@gmail.com Website - www. Shabnamnews.In RNI.No.MHAMAR/2015/47384

www.shabnamnews.in
संपूर्ण महाराष्ट्रातील बातमी एका क्लिक वर

SHABNAM NEWS

शबनम न्यूज

मराठी वृत्तपत्र,वृत्तवाहिनी, मराठी न्यूजपोर्टल
विश्वसनीय वृत्तसंस्था

दिनांक 16/03/2025
आदर्श नारी पुरस्कार विशेषांक



## सामाजिक व राजकीय कार्यात अग्रेसर

# सौ.सुप्रिया महेश चांदगुडे









सौ सुप्रिया महेश चांदगुडे. उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर जिल्हा. संस्थापक अध्यक्ष आधार महिला मंडळ.सामाजिक कामात मोठे योगदान. आधार महिला मंडळाच्या माध्यमातून अनेक महिलांना रोजगाराची निर्मिती. आधार महिला मंडळाच्या माध्यमातून जवळपास 2300 महिलांचे संघटन, माजी नगरसेवक कैलास भाऊ चांदगुडे यांच्या मार्गदर्शनात समाजकार्यात तसेच राजकीय क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. चांदगुडे परिवार पहिल्यापासूनच सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याने सौ सुप्रिया चांदगुडे यांनी ही आपल्या परिवाराची समाजसेवेची परंपरा पुढे सुरु ठेवली आहे. महिला बचत गटांचे संघटन व त्या माध्यमातून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने राबविण्यात येणाऱ्या पवनाथाडी किंवा इंद्रायणी थडी अशा जत्रेच्या माध्यमातून स्टॉल उपलब्ध करून देणे महिला सक्षमीकरणासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविणे यामध्ये आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, नोकरी महोत्सव ,रोजगार मिळावे इत्यादींचा समावेश आहे.

महिलांचे आरोग्य चांगले राहावे या दृष्टिकोनातून महिलांसाठी अनेक आरोग्य शिबिराचे आयोजन सौ सुप्रिया चांदगुडे यांच्या माध्यमातून राबविण्यात आले आहेत.महिला दिन, नागपंचमी, नवरात्र महोत्सवामध्ये महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी अनेक प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन. स्वतःचा वाढदिवस मोठ्या प्रमाणात साजरा न करता अंध अपंग गरीब मतिमंद मुलांसमवेत वाढदिवस साजरा करणे. तसेच अनाथ आश्रम आणि वृद्धाश्रमामध्ये जाऊन अन्नदान कपडे वाटप अशा अनेक स्तुत्य उपक्रमच्या माध्यमातून वाढदिवस साजरे करणे करणे.पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीन दुर्घटना घडली तेथे भरीव मदत आणि तेथील लोकांना मदत त्याच बरोबर कोल्हापूर या ठिकाणी महापुराच्या वेळेस प्रत्यक्ष जाऊन तेथील नागरिकांना अन्नधान्य कपडे यांची जागेवरती जाऊन मदत करण्याचे काम.अतिशय शांत संयमी मितभाषि स्वभाव वेळेला तत्परतेने हजर राहणे ही एक महिला म्हणून त्यांची ओळख आहे.प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये सहभाग घेऊन त्याच्या पाठीमागे उभे राहणे.कोरोना सारख्या महामारी काळात अनेक नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंची मदत सुप्रिया चांदगुडे यांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. तसेच कोरोना काळात अनेक रुग्णांना हॉस्पिटल सुविधा आरोग्याच्या विविध सुविधा त्यांच्या माध्यमातून पुरविण्यात आले आहे. आयुष्यमान भारत कार्ड योजना त्यांनी आपल्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून राबविली यातून एकूण बाराशे कुटुंबांना आयुष्यमान भारत कार्ड उपलब्ध करून देण्यात आले. त्यांच्या याच संपूर्ण सामाजिक व राजकीय कार्याची दखल घेत त्यांना शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने दिला जाणारा आदर्श नारी पुरस्कार दिला जात आहे.



## सतार शहरात शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी

# संगीता ज्ञानेश्वर काळे

संगीता ज्ञानेश्वर काळे, एम ए एम एड पर्यंत झालेले त्यांचे शिक्षण, साताऱ्यातील सातारा एज्युकेशन सोसायटी संचलित अनंत इंग्लिश स्कूल येथे उपशिक्षिका म्हणून कार्यरत, आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांना उत्तम उत्तम शिक्षण मिळावे यासाठी त्या नेहमी प्रयत्नशील असतात त्यांचे उत्तम वक्तृत्व, शिक्षण देण्याची उत्तम पद्धत यामुळे त्यांच्या शाळेचा निकाल हा नेहमीच उत्तम उत्तम लागला आहे. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासोबतच सामाजिक कार्यातही त्यांनी आपला ठसा उमटविला आहे अनेक वर्षात राज्यस्तरीय शिक्षकांसाठी कथाकथन स्पर्धेत द्वितीय क्रमांक, वैज्ञानिक जाणीव प्रकल्प सहभाग, सातारा जिल्हा हिंदी अध्यापक मंडळातर्फे 100% निकालाबद्दल गौरव, सर्व शिक्षा अभियानात सहभाग, नैतिक मूल्य शिक्षण माउंट अबू राजस्थान येथे प्रशिक्षण पूर्ण, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा




अभियान, यशदा आयोजित शिक्षक प्रशिक्षण पूर्ण यशवंत चॅरिटेबल ट्रस्ट पार्ले कराड यांच्याकडून गौरव, रोटरी क्लब सातारा कॅम्प देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेत उत्तेजनार्थ सहभाग, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी मुंबई दोन दिवसीय राज्यस्तरीय समारंभात प्रमुख उपस्थिती, गांधी विचार संस्थान परीक्षा मार्गदर्शक म्हणून गौरव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथे नैतिक मूल्य शिक्षण प्रशिक्षण पूर्ण, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ डीएसएम प्रमाणपत्र नाट्य अभिवाचन स्पर्धेत सहभाग, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी मुंबई सार्थक चर्चा , मौलिक योगदान दिल्याबद्दल सन्मान, महिला दिनानिमित्त एकपात्री अभिनय स्पर्धेत उत्तेजनार्थ तृतीय क्रमांकाचे बक्षीस, किसनराव साबळे पाटील विद्यालय येथे महिला दिनानिमित्त विद्यार्थी व शिक्षक यांना मार्गदर्शन ,नदीचे प्रदूषण टाळण्यासाठी निर्माल्य प्रकल्पाबद्दल गौरव , गरीब होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीच्या समस्येवर उपाय व त्यावर कृती संशोधन, सांस्कृतिक स्तोत्र एवम प्रशिक्षण केंद्र नवी दिल्ली उदयपूर राजस्थान येथे 21 दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण, स्वच्छ भारत अभियानात सहभाग अशा अनेक शैक्षणिक उपक्रमात सहभाग यामुळे संगीता ज्ञानेश्वर काळे यांनी आपल्या शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे समाजात आदर्श निर्माण केला आहे.त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील याच कार्याची दखल घेत त्यांना शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने दिला जाणारा आदर्श नारी पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

## महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असणार व्यक्तिमत्व

# सौ.अनिता सुंदर कांबळे

### संविधान महिला मंडळाच्या अध्यक्षा











पिंपरी चिंचवड मध्ये कामगार नेते म्हणून सुंदर कांबळे हे सर्वांनाच परिचित आहे, त्यांचे कार्य, त्यांनी आजपर्यंत समाजासाठी केलेले अनेक सामाजिक उपक्रम चर्चेत असतात त्यांच्याच खांद्याला खांदा लावून त्यांच्या पत्नी सौ. अनिता सुंदर कांबळे या सामाजिक कार्यात कार्यरत आहेत, पहिल्यापासूनच सामाजिक कार्याची आवड असल्याने त्यांनी संविधान महिला मंडळाची स्थापना केली. या महिला मंडळाच्या माध्यमातून अनेक निराधार गरजू महिलांना त्यांनी मदतीचा हात दिला आहे. संविधान महिला मंडळाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविताना त्यांना महिलांच्या अडीअडचणी जवळून पहावयास मिळाल्या. त्यानुसार त्यांनी महिला बचत गट स्थापन करून या महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी तसेच महिला बचत गटाच्या व्यावसायिक उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आजपर्यंत अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. महिला या सक्षम व्हाव्या , स्वतःच्या पायावर उभ्या राहव्या याकरिता सौ. अनिता सुंदर कांबळे या नेहमी प्रयत्नशील असतात. महिलांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी त्या नेहमी या महिलांसाठी विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करतात तसेच ज्या निराधार कुटुंबांना घरे नाही अशा कुटुंबांना शासनाच्या आवास योजनेअंतर्गत घरे मिळून देण्याची कामे मोठ्या प्रमाणात सुंदर कांबळे व अनिता सुंदर कांबळे यांच्या वतीने झाले आहे. महानगरपालिका वतीने अनेक योजना राबविल्या जातात या योजनांचा लाभ संविधान महिला मंडळाच्या वतीने अनेक कुटुंबांना देण्याचे काम अनिता सुंदर कांबळे या करीत आहेत . अनेक शासकीय योजनांचा लाभ त्यांनी आजपर्यंत मिळवून दिला आहे. महिलांनी स्वयंरोजगार सुरु करावे यासाठी त्या नेहमी मार्गदर्शन शिबिर व त्याकरिता अनेक उपक्रम राबवित असतात ,तसेच आपले भारतीय सण समारंभ व राष्ट्रीय सण मोठ्या उत्साहात साजरे करून या निमित्ताने अनेक महिलांना एकत्र आणून त्यांचे संघटन त्यांनी केले आहे. तसेच संविधान महिला मंडळाच्या सर्व महिला सदस्यांना त्यांनी 8 मार्च जागतिक महिला दिनानिमित्त मागील वर्षी अलिबाग येथे सहल आयोजित केली , ज्या महिला घरातून बाहेर पडत नाही अशा महिलांना एक दिवस तरी सहलीच्या निमित्ताने आनंद घेता यावा यासाठी त्यांनी हे प्रयत्न केले आहे. तसेच त्यांचे सामाजिक काम निरंतरपणे यापुढे सुरु राहणार आहे. याबरोबरच महानगरपालिका शासनाच्या चुकीच्या कारभारावरही त्यांनी अनेक वेळा प्रश्न उपस्थित केले आहे तसेच या विरोधात त्यांनी अनेक आंदोलने केली त्यांच्या अनेक आंदोलनाला यश मिळाले आहे. काही दिवसापूर्वीच महानगरपालिकेच्या काही कामगारांना न्याय देण्यासाठी त्यांनी मोठे आंदोलन केले. असे अनेक सामाजिक उपक्रम सौ. अनिता सुंदर कांबळे यांच्या वतीने राबविले जात आहेत प्रामुख्याने महिलांसाठी त्या नेहमी कार्यरत असतात महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी ते नेहमी उपक्रम राबवत असतात त्यांच्या या सर्व कार्याची दखल शबनम न्यूज मीडिया ग्रुपने घेतली असून त्यांना जागतिक महिला दिनानिमित्त दिला जाणारा आदर्श नारी पुरस्कार दिला जात आहे. या सर्व कार्याची दखल घेतली शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने दिला जाणारा आदर्श नारी पुरस्कार अनिता सुंदर कांबळे यांना देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

www.shabnamnews.in
संपूर्ण महाराष्ट्रातील
बातमी एका क्लिक वर

SHABNAM NEWS
शबनम न्यूज
मराठी वृत्तपत्र,वृत्तवाहिनी,
मराठी न्यूजपोर्टल
विश्वसनीय वृत्तसंस्था

दिनांक 16/03/2025
आदर्श नारी पुरस्कार विशेषांक

# अजराक सुपरजायंट्सला सहाव्या सिंधी प्रीमिअर लीगचे विजेतेपद

## सिंधी तरुणांनी सामाजिक भान जपत एएनपी केअर फाऊंडेशनला दिली रुग्णवाहिका भेट

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणे: अजराक सुपरजायंट्सने एसएसडी फाल्कन्सचा 4 गडी राखून पराभव करत सहाव्या सिंधी प्रीमिअर लीगचे विजेतेपद पटकविले. अष्टपैलू कामगिरी करणारा नरेंद्र लुंड सामनावीर ठरला. पिंपरीतील मृणाल क्रिकेट मैदानावर 24 दिवस ही स्पर्धा झाली. कसोटी क्रिकेटच्या धर्तीवर दोन डावांचा अंतिम सामना झाला. प्रत्येक डावात 9 षटके खेळण्यात आली.



नाणेफेक जिंकून एसएसडी फाल्कन्सने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या डावात 9 षटकात 7 गडी गमावत 40 धावा केल्या. अजराक सुपरजायंट्सने पहिल्या डावात अवघ्या 5 धावांची आघाडी घेत 8 बाद 45 धावा केल्या. दुसऱ्या डावात एसएसडी फाल्कन्सने आक्रमक खेळ करत 57 धावा उभारल्या. विजयासाठी 53 धावांचे लक्ष घेऊन मैदानात आलेल्या सुपरजायंटचा सलामीवीर अष्टपैलू नरेंद्र लुंडने धडाकेबाज 33 धावांची खेळी करत संघाला विजेतेपद मिळवून दिले. राज गोविंदानीने दोन्ही डावांत 2-2 बळी घेतले. 33 धावांची खेळी आणि दोन्ही डावांत मिळून 4 बळी घेणाऱ्या नरेंद्र लुंड याला सामानावीराचा किताब मिळाला.

सिंधी तरुणांना खेळांसाठी प्रोत्साहित करण्याच्या, तसेच सिंधी संस्कृतीचे जतन आणि सामाजिक भावनेतून गेल्या सहा वर्षांपासून 'सिंधी प्रीमिअर लीग'चे आयोजन केले जाते. यंदा लीगमधून उभारलेल्या निधीतून एएनपी केअर फाऊंडेशनला अँब्युलन्स देण्यात येणार असल्याचे संयोजक हितेश दादलानी व कन्वल खियानी यांनी सांगितले.

**महिलांमध्ये गंगा वॉरियर्स विजयी**

गंगा वॉरियर्सने सलग दुसऱ्या वर्षी सिंधी प्रीमिअर लीगचे विजेतेपद पटकावले. गंगा वॉरियर्स आणि यमुना स्ट्रायकर्स यांच्यात अंतिम सामना रंगला. गंगा वॉरियर्सने कर्णधार शीतल आसवानी (16 चेंडूत 26 धावा) व ममता (17 चेंडूत 20 धावा) यांच्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर निर्धारित 8 षटकांत 3 बाद 60 धावा केल्या.

विजयासाठी 61 धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या यमुना वॉरियर्सची सुरुवात अडखळत झाली. शीतलने गोलदांजीतही कमाल करीत 2 बळी घेतल्याने यमुना वॉरियर्सचा डाव 8 षटकांत अवघ्या 35 धावांत संपुष्टात आला. शीतल आसवानीला सामनावीराचा किताब मिळाला.

**संक्षिप्त धावफलक : (पुरुष गट)**

**पहिला डाव**

एसएसडी फाल्कन्स: 9 षटकांत 7 बाद 40 (जतीन गोविंदानी 12, नरेंद्र लुंड 9-2)

अजराक सुपरजायंट्स : 9 षटकांत 8 बाद 45 (कुणाल सिरवानी 22, राज गोविंदानी 20-2)

दुसरा डाव

एसएसडी फाल्कन्स : 9 षटकांत 7 बाद 57 (राहील दायलानी 28, रोहित मुलचंदानी 14, नरेंद्र लुंड 8-2, जतीन सेवानी 14-2, जय मायारमनी 14-2)

अजराक सुपरजायंट्स : 9 षटकांत 5 बाद 53 (नरेंद्र लुंड 33, राज गोविंदानी 10-2, जयेश मायारामानी 10-2)

निकाल: अजराक सुपरजायंट्स 4 विकेट्स राखून विजयी

**संक्षिप्त धावफलक : (महिला गट)**

गंगा वॉरियर्स - 8 षटकांत 3 बाद 60 (शीतल आसवानी 26, ममता 20)

विजयी यमुना स्ट्राइकर्स : 8 षटकांत 6 बाद 35 (स्वीटी 7, पर्ल 7, शीतल आसवानी 4-2)

# फ्लॅग हंटर सायबर हॅकाथॉन २०२५'चे भव्य आयोजन

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी: डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, पिंपरीच्या संगणक विज्ञान विभाग, बी.एससी. सायबर आणि डिजिटल सायन्स व एम.एससी. सायबर सिक्युरिटी विभाग आणि XIT ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय 'फ्लॅग हंटर सायबर हॅकाथॉन 2025' चे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे, XIT ग्रुपचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहित कांबळे हे डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून, त्यांनी सायबर सुरक्षा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्रासह गोवा, आंध्र प्रदेश, गुजरात आणि इतर राज्यांतील 350 हून अधिक संघांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी क्रिप्टोग्राफी, वेब एक्सप्लॉइटेशन, रिव्हर्स इंजिनिअरिंग आणि फॉरेन्सिक्स यांसारख्या सायबर सुरक्षा समस्यांवर उत्कृष्ट कामगिरी केली. स्पर्धेच्या पहिल्या दोन फेऱ्या 9 आणि 10 मार्च रोजी ऑनलाईन पार पडल्या, तर अंतिम फेरी प्रत्यक्ष उपस्थितीत घेण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य



डॉ. रणजीत पाटील, संगणक विज्ञान विभाग प्रमुख डॉ. सुजाता पाटील, बी.एससी. सायबर आणि डिजिटल सायन्स व एम.एससी. सायबर सिक्युरिटीचे समन्वयक श्री. सत्यवान कुंजीर, तसेच इव्हेंट समन्वयक श्री. सम्मेद बुकशेटे आणि सायबर तज्ञ श्री. तुषार जाधव यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. एमआयटी (W P U) च्या शिरीष शिवकुमार सिंग यांनी प्रथम क्रमांक पटकावला, पारुल युनिव्हर्सिटी (गुजरात) चे विद्यार्थी अथर्व सचिन तोरस्कर आणि गोस्वामी विवेक रमेशगिरी यांनी द्वितीय क्रमांक मिळवला, तर कमिन्स कॉलेजची विद्यार्थिनी तनिषा चव्हाण हिने तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना प्रमाणपत्र, रोख बक्षीसे, ट्रॉफी आणि XIT ग्रुपमध्ये इंटर्नशिपची संधी प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमास डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीचे सचिव डॉ. सोमनाथ पाटील आणि अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील यांनी उपस्थित राहून विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सायबर सुरक्षा क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच क्विक हील फाउंडेशनचे असोसिएट डायरेक्टर श्री. अजय शिर्के यांनी विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालय आणि XIT ग्रुप सायबर सुरक्षा शिक्षण आणि संशोधनासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. भविष्यातही अशा स्पर्धा आणि प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना सायबर हल्ले आणि त्यावरील उपाययोजनांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल.

# सावरकर उद्यानात अस्वच्छता करणाऱ्यांवर कारवाई करा

## नंदकुमार सातुर्डेकर यांची मागणी



शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी धुलीवंदनाच्या दिवशी निगडी प्राधिकरणातील सावरकर उद्यानात अस्वच्छता करणाऱ्यांवर कारवाई करून अस्वच्छता दंड वसूल करण्याची मागणी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य नंदकुमार सातुर्डेकर यांनी केली आहे. यासंदर्भात सातुर्डेकर यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की,पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी प्राधिकरणातील सेक्टर नंबर 26 येथे महापालिकेने गणेश तलावामध्ये सावरकर उद्यान विकसित केले आहे. या ठिकाणी अनेक आबालवृद्ध व्यायामासाठी तसेच मॉर्निंग वॉकसाठी उद्यानात येत असतात. मात्र या उद्यानासमोरील पटांगण विविध खाजगी संस्था विविध कार्यक्रमांसाठी वापरत आहेत. त्यांच्यावर महापालिकेच्या उद्यान विभागाचे कोणतेही नियंत्रण दिसत नाही.



शुक्रवारी धुलीवंदन सणाच्या निमित्ताने प्राधिकरणातील भाजपच्या दोन पदाधिकाऱ्यांनी या उद्यानातील पटांगणात रंगोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमांमध्ये अल्पोपहार देण्यासाठी वापरलेल्या डिश आणि पाण्याच्या बिसलेरी बाटल्या व्यायामासाठी लावलेल्या साहित्याच्या ठिकाणी तशाच टाकून देण्यात आल्या. शहरात अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांकडून महापालिका अस्वच्छता दंडाबद्दल पाच हजार रुपये दंड वसूल करते. मग हाच नियम सावरकर उद्यानात अस्वच्छता करणाऱ्या त्या दोन पदाधिकारी आणि उद्यानात अस्वच्छता करणाऱ्यांना लावणार का? या मंडळींकडून प्रत्येकी पाच हजार रुपये दंड वसूल करणार का? असा सवाल सातुर्डेकर यांनी केला आहे. या प्रकरणी लक्ष घालून आयोजकांकडून दंड वसूल करावा तसेच महापालिकेचे सदरचे उद्यान सुस्थितीत राहावे यासाठी उद्यानाची, त्यालगतची पटांगणाची जागा महापालिकेने यापुढे कोणालाही वापरासाठी देऊ नये. अन्यथा कार्यकर्ता म्हणून या विरोधात आवाज उठवावा लागेल. असा इशारा सातुर्डेकर यांनी दिला आहे.

# महिला दिनानिमित्त सोहम् ग्रंथालयाच्या वतीने महिला पोलीस सन्मानित

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी 'अधिकारी महिलांनी समाजातील उपेक्षित महिलांना न्यायाची आणि सन्मानाची वागणूक द्यावी!' असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या कविता बहल यांनी सोहम् सार्वजनिक ग्रंथालय आणि अभ्यासिका, संत तुकारामनगर, पिंपरी येथे शनिवार, दिनांक 08 मार्च 2025 रोजी व्यक्त केले. जागतिक महिला दिनानिमित्त ग्रंथालयाच्या वतीने महिला पोलीस कर्मचारी आणि स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थिनी यांचा प्रातिनिधिक सन्मान करताना कविता बहल बोलत होत्या. सोहम्



ग्रंथालयाचे संस्थापक - अध्यक्ष जगन्नाथ नेरकर, सचिव प्रदीप बोरसे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.कविता बहल पुढे म्हणाल्या की, 'एकेकाळी पुरुषांची मक्तेदारी असलेल्या पोलीस खात्यात किरण बेदींसारख्या महिलांनी आपल्या कर्तबगारीने कर्तव्य अन् कर्तृत्वाचे नवीन मानदंड निर्माण केले आहेत. त्याचा आदर्श आताच्या कार्यरत आणि भावी महिला अधिकारी यांनी घ्यावा!' जगन्नाथ नेरकर यांनी प्रास्ताविकातून ग्रंथालय आणि अद्ययावत अभ्यासिकेची माहिती देऊन, 'संत मुक्ताई, राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, भारतरत्न लता मंगेशकर ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या अशा असंख्य थोर महिलांनी भारताचे नाव जगाच्या इतिहासात उज्ज्वल केले आहे. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असलेतरी विद्यार्थिनींनी केवळ महिलादिनालाच नव्हे तर नेहमीच समाजातील महिलांचा आदर ठेवून उच्च ध्येयाचे लक्ष्य गाठावे!' अशी अपेक्षा व्यक्त केली. पोलीस कर्मचारी पल्लवी माने यांनी सत्काराला उत्तर देताना प्रातिनिधिक मनोगतातून, 'आईवडिलांचा आशीर्वाद, कठोर परिश्रम, नियमित अभ्यास यामुळे निश्चितच अपेक्षित यशप्राप्ती होते!' अशी भावना व्यक्त केली.प्रदीप बोरसे यांनी सूत्रसंचालन केले. वर्षा बोरसे यांनी आभार मानले.

# एसबीपीआयएम चा माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी, पुणे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मधील माजी विद्यार्थ्यांचे यश हे सर्व प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणारे आहे. या माजी विद्यार्थ्यांची प्रगती पाहून प्राध्यापकांना आणखी चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळते असे एसबीपीआयएम च्या संचालक डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचालित एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये बारावा माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मेळाव्यास डॉ. कीर्ती धारवाडकर, डॉ. रुपाली कुदरे, हेमंत राजेशथ, आकाश राऊत, डॉ. अनिषकुमार कारिया, डॉ.स्वप्नील सोनकांबळे, डॉ. भूषण परदेशी, एमबीए प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी, शिक्षक, माजी विद्यार्थी उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी "एसबीपीआयएम पिनॅकल" या न्यूजलेटरच्या



पहिल्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यामध्ये माजी विद्यार्थ्यांची यशोगाथा, प्रगती आणि मार्गदर्शन इतर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, त्यांना प्रेरणा देणे हे अंकाच्या सहाय्याने करण्यात येणार आहे. इतर विद्यार्थ्यांना त्याची मदत होईल असे एसबीपीएमच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी सांगितले. उद्योजक हर्षल बोरसे व प्रीती प्रभाकरण या माजी विद्यार्थिनीने जिद्द आणि चिकाटीने स्पर्धा परीक्षा आणि करिअरमध्ये कसे यशस्वी होता येईल याविषयी मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थी पियुष चावडा, तुषार चिंचोले, आदित्य चिकणे, अजय बैरागी, प्रतीक नाईक, मयूर निलंगेकर या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव सांगितले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी माजी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे संयोजन डॉ. स्वप्निल सोनकांबळे, डॉ. काजल माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली माजी विद्यार्थी संघटना यांनी केले.

सूत्रसंचालन सुरज पाटील आणि तृप्ती गुप्ता यांनी केले. डॉ. अनिषकुमार कारिया यांनी आभार मानले.




# दुर्गा ब्रिगेड संघटनेतर्फे दुर्गा शक्ती पुरस्कार सोहळा उत्साहात साजरा

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणेकर महिला या खूप कार्यशील आहेत. शासनाच्या पिंक रिक्षा योजनेचा महिला भगिनींनी लाभ घ्यावा. पुणे शहरातील महिला सायकल चालवतात हे पुण्याचे विशेष आहे. महिला प्रत्येक क्षेत्रामध्ये पुढे आहेत हा पुण्याचा अभिमान आहे. पुढील काळात महिलांनी स्वतःचे वेगवेगळे गट बनवून आपापले स्टार्टअप उद्योग उभे करण्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन कायनेटिक ग्रुपचे अध्यक्ष , पद्मश्री अरुण फिरोदिया यांनी केले.



पुणेकर महिला या खूप कार्यशील : अरुण फिरोदिया

दुर्गा ब्रिगेड संघटनेतर्फे चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात दुर्गाशक्ती पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. त्यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून ते बोलत होते. महापालिका अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उद्योजिका जयश्री फिरोदिया,. एम.आय.टी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालिका डॉ सुनिता कराड,महाराष्ट्र पत्रकार संघ प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकडे, ए.बी.पी माझाच्या पत्रकार शिवानी पांढरे, माजी नगरसेविका शैलजा मोरे, अनुराधा गोरखे , सूर्यदत्ता इन्स्टिट्यूटच्या उपाध्यक्ष स्नेहल नवलाखा, सामाजिक कार्यकर्त्या अनमोल पुणेकर आदी उपस्थित होते. या वेळी दुर्गा ब्रिगेड संघटनेतर्फे इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर आणि दुर्गा ब्रिगेडच्या अध्यक्षा दुर्गा भोर यांच्या हस्ते जयश्री फिरोदिया, डॉ. सुनिता कराड, एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, स्नेहल नवलाखा तसेच सामाजिक कार्यकर्त्या अनमोल पुणेकर यांचा दुर्गाशक्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रातील उत्तुंग कामगिरी केलेल्या महिला भगिनींचाही या वेळी पुरस्कार्थी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सडॉ सुनिता कराड यांनी महिलांनी आणि मुलींनी आधुनिक तंत्रज्ञान शिकून घ्यावे आणि स्वतः कौशल्य विकसित करून रोजगाराच्या अनेक संधींचा लाभ घ्यावा. यासाठी एमआयटी कॉलेज कडून नक्कीच सहकार्याची भूमिका घेतली जाईल, अशी ग्वाही दिली. तर चंद्रकांत इंदुलकर म्हणाले, महानगरपालिकेतर्फे महिलांसाठी काचघर सारखे अनेक प्रकल्प उभे करण्यात आले आहेत. त्याचा शहरातील महिलांनी लाभ घ्यावा. राजकीय पक्षांना सत्तेवर बसविण्याची ताकद ठेवणाऱ्या लाडक्या बहिणीं महाराष्ट्राला अद्यापही महिला मुख्यमंत्री का मिळवून देऊ शकल्या नाहीत.!! याचं आत्मपरीक्षण करत ,यापुढे महिलांनी राजकारणात अधिक सक्रीय व्हायला हवं असं मत गोविंद वाकडे यांनी व्यक्त केलं तसेच ए बी पी माझाच्या तरुण तडफदार पत्रकार माननीय शिवानी पांढरे आपले विचार मांडताना स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यांची प्रवृत्ती ठेचली पाहिजे त्यांनी महिला भगिनींना उद्देशून स्वतःसाठी उभ्या राहा स्वतःसाठी लढा स्वतःच्या स्वप्नांसाठी लढा आणि स्वतःची स्वप्न पूर्ण झाल्यावर दुसऱ्यांची स्वप्न पूर्ण करा माननीय संपादक सरिता कौशिक यांचा पुरस्कार मी स्वीकारत आहे याचे माझे भाग्य आहे असे माननीय शिवानी पांढरे म्हणाल्या इंडस्ट्रीज असोसिएशनचे अभय भोर यांनी पिंपरी चिंचवड एमआयडीसी परिसरात 5000 कंपन्या असून या कंपन्यांना मूलभूत सुविधांपासून अनेक वस्तूंची गरज असते आणि या वस्तू निर्मितीमध्ये आणि सेवा क्षेत्रात महिलांनी पुढाकार घेतल्यास त्यांना रोजगाराच्या संधी संघटनेतर्फे निश्चितपणे देण्यात येतील. या कार्यक्रमास महिला भगिनींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

> “ महिलांना स्व:रक्षणार्थ प्रशिक्षण घेण्याची वेळ आली आहे. पूर्वी महिलांवर अत्याचार व्हायचे. परंतु, सध्या लहान मुलींवर सुद्धा असे अतिप्रसंग घडण्याचे प्रमाण वाढले आहेत. त्यामुळे महिला आणि मुलींनी स्वः प्रशिक्षणार्थ प्रशिक्षण घेऊन संकटांवर मात करण्यासाठी खंबीर होण्याची गरज आहे. - दुर्गा भोर : संस्थापक, अध्यक्षा, दुर्गा ब्रिगेड. ”

SHABNAM NEWS
शबनम न्यूज
मराठी वृत्तपत्र,वृत्तवाहिनी,
मराठी न्यूजपोर्टल
विश्वसनीय वृत्तसंथा
दिनांक 16/03/2025
आदर्श नारी
पुरस्कार विशेषांक

## एक संवेदनशील लेखिका आणि कवियित्री

# श्रीमती कमल उत्तम सोनजे



उत्तम कवयित्री आपल्या कवितेने अनेकांना आनंदमय जीवनाची प्रेरणा देणारे कवी मनाचे व्यक्तिमत्व , त्यांच्या अनेक कविता आजपर्यंत प्रकाशित झाल्या आहेत. त्यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले आहे. अत्यंत बिकट परिस्थितीत आपल्या सामाजिक व वैयक्तिक जीवनाची अनेक टप्पे पार करताना एकीकडे संघर्षमय जीवन व दुसरीकडे कविता व लेखन करण्याची आवड यातूनच आपला जीवन प्रवास करत त्यांनी आपली एक आगळीवेगळी प्रतिमा समाजात निर्माण केली, तसेच आपल्या कवितेतून व लेखनातून समाजात आदर्श निर्माण केला अशा या कमल उत्तम सोनजे यांनी आपला जीवन प्रवास त्यांच्याच शब्दात सांगितला आहे .मी श्रीमती कमल उत्तम सोनजे.माझे वय सत्तर आहे.लहानपणापासून मला लिखाणाची आवड आहे.शेतकरी कुटुंबातील असल्याने,निसर्गातच वाढले.निसर्गाची विविध रुपे बदलतांना पाहून,सहज कविता आणि लेख लिहायला सुचत असे.वडील नसल्याने माझे सोळा वर्षांची असतानाच लग्न झाले.पुण्यात आल्यावर दहा बाय दहाच्या खोलीत, दोन दिरांसह संसार सुरु झाला.काही येत होते, काही अज्जीबात येत नव्हते.पण शिकले हळूहळू एकेक गोष्ट! प्रचंड गरीब परिस्थितीमुळे, आईवडीलांना गावी पैसे पाठवायचे असल्याने,माझे पती कंपनीतून सुटले की,एका वर्कशॉपमध्ये दीड रुपाया तासाप्रमाणे कामाला जात होते.सकाळी सहा ते रात्री आठ,असे काम करीत होते.पाच वर्षात आम्हाला तीन मुलगे झाले.परिस्थितीवर मात करीत असताना एक दिवस अचानक पतींना जबरदस्त अपघात झाला.त्यात त्यांच्या उजव्या पायाला प्रचंड मोठे फ्रॅक्चर झाले.आणि तिथूनच माझ्या आयुष्यात संघर्ष सुरु झाला.तब्बल तीन वर्षांनी ते मोकळे चालायला लागले.आधी कुबड्या,मग काठी आणि मग हळूहळू मोकळे चालायला लागले.कामावर जाता येत नव्हते, त्यामुळे पगारही बंद झाला होता.पण मी हिंमत नाही हारले.जीव तोडून संसाराची गाडी चालवत होते.सगळे काम आटोपले की पेपर वाचायचे.जिथे जिथे लिखाण पाठवायचे असेल तिथे तिथे पाठवायचे.निबंध स्पर्धांमध्ये भाग घ्यायचे.सकाळच्या पुरवणी पुस्तीकेत माझे जवळ जवळ तीस पस्तीस लेख छापून आले आहेत.अनेक दिवाळी अंकात लेख प्रसिद्ध झालेले आहेत.अनेक कविता मी केल्या आहेत.टाटामोटर्सच्या दिवाळी अंकात माझे सोळा वर्षे लेख छापून आले.आठ वेळा पुरस्कार मिळाले,त्यात सतत पाच वर्षे प्रथम पारितोषिक मिळाले.अनेक निबंध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट निबंधाचे बक्षिस मिळाले.अगणित पुरस्कार मिळाले.मी हे सर्व करीत असताना घराकडे किंवा मुलांकडे अज्जीबात दुर्लक्ष केले नाही.गृहिणीपद सुद्धा मी आदर्श पद्धतीनेच केले.शिस्त, स्वावलंबन, आणि स्वच्छता हे मुलांच्या मनावर खोलवर बिंबवले..मी एक संवेदनशील लेखिका आणि कवियित्री आहे.त्यामुळे कुठलेही काम केले तर मी त्याची वाच्यता सुद्धा करीत नाही.चाळीस पन्नास वर्षे फक्त संघर्ष केला.बरोबरीच्या मैत्रिणी सिनेमा, हॉटेल, आणि बाहेर फिरायला जात होत्या.पण मी पतींच्या सेवेत, आणि मुलांच्या संगोपनातच असायचे.खूप मन मारुन जगावे लागत होते.मुलांचे बालपण अचानक प्रौढ झाले होते.पण सगळे दिवस पार पाडले.मुले डबलटिबल पदवीधर झाले.आणि वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये कामात व्यस्त आहेत.त्यांना माझा संघर्ष चांगलाच आठवतो.त्यामुळे मला मुले जीवापाड जपतात.मी पाचवेळा ऑस्ट्रेलियाला जाऊन आले,त्याचे प्रवास वर्णन लिहिले आहे.माझी ऑस्ट्रेलियाची सफर.माझे आत्मचरित्र लिहिले आहे.दोनशे ते अडीचशे कविता लिहिल्या आहेत.माझे खूप मोठे साहित्य आहे












## प्रामाणिक,मेहनती व तत्पर आशा वर्कर

# सौ.अश्विनी विशाल पवळ - सरोदे



आशा वर्कर म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिके अंतर्गत कार्यरत, खराळवाडी गांधीनगर परिसरात आशा वर्कर म्हणून उल्लेखनीय कार्य, पिंपरी चिंचवड शहराच्या वायसीएम रुग्णालयाच्या अंतर्गत आशा वर्कर म्हणून काम करताना परिसरातील गरोदर महिला,ज्येष्ठ नागरिक, लहान बालके यांच्या आरोग्यासाठी तत्परतेने कार्य करणारे व्यक्तिमत्व, लहानपणापासूनच सामाजिक कार्याची आवड असल्याने तसेच माहेरी दहावीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर घरच्यांच्या सांगण्यावरुन दहावीनंतरच लग्न झालं त्यानंतर सासरी आल्यानंतर आपल्याला पुढे अजून शिकायचे आहे अशी इच्छा त्यांनी आपले पती विशाल यांच्याकडे व्यक्त केली व त्यांचे पती विशाल पवळ यांनी अश्विनी यांना भक्कमपणे पाठिंबा देत पुढील शिक्षणासाठी संमती दिली त्यानंतर अश्विनी विशाल सरोदे यांनी आपले बीएपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले तसेच पुढे जाऊन GNM चे शिक्षण पूर्ण करीत आता वायसीएम रुग्णालया अंतर्गत आशा वर्कर म्हणून कार्यरत आहेत. नागरिकांच्या आरोग्यासाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या आशा वर्कर म्हणून अश्विनी विशाल पवळ सरोदे यांचे नाव घेतले जाते. आशा वर्कर यांना शासनाच्या वतीने खूप कमी प्रमाणात मानधन दिले जाते या कमी मानधनातही अश्विनी आपले काम प्रामाणिकपणे करीत आहेत. आशा वर्कर म्हणून काम करताना वेळ काळ त्यांनी कधीही पाहिला नाही रात्र असो वा दिवस त्यांना गरोदर मातेसाठी किंवा लहान बालकांसाठी आहोरात्र मेहनत घ्यावीच लागते .गरोदर महिला तसेच लहान बालकांसाठी विशेष करून त्या काम करत असतात तसेच खराळ वाडी व गांधीनगर परिसरात नागरिकांपर्यंत महानगरपालिका वतीने दिला जाणाऱ्या सर्व योजना पोहोचविण्याचे काम त्या करीत आहेत. तसेच नागरिकांना आयुष्यमान भारत कार्ड, महात्मा फुले आरोग्य सेवा या अंतर्गत शासनाच्या आरोग्य सेवा देण्याचं काम त्या प्रामाणिक पणे करत आले आहेत तसेच कोरोना काळात त्यांनी अनेक कुटुंबांना आरोग्यसेवा देण्याचं विशेष काम केले आहे कोरोना काळात रुग्णांना रुग्णसेवा देताना त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल कोविड योद्धा म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. या सर्व कार्यात त्यांचे पती विशाल पवळ हे त्यांना भक्कमपणे साथ देत असतात. गरोदर महिला,माता व बालकांसाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी अहोरात्र काम करणाऱ्या आशा वर्कर अश्विनी विशाल सरोदे यांना जागतिक महिला दिनानिमित्त दिला जाणारा आदर्श नारी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे.









## डोणे गाव आदर्श गाव म्हणून ओळखले जावे यासाठी नेहमी प्रयत्नशील

# • सौ.अश्विनी बाळासाहेब घारे












मावळ तालुक्यातील एकता महिला मंच च्या अध्यक्षा, सुरुवातीपासूनच सामाजिक कार्याची आवड त्यांचे पती बाळासाहेब घारे यांची साथ मिळाल्याने अनेक सामाजिक कामात सक्रिय सहभाग, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी,डोणे गाव येथील जिल्हा परिषद शाळेत शाळा व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून कार्यरत या माध्यमातून अनेक शैक्षणिक उपक्रमात सहभाग सामाजिक कार्यात सहभाग असल्याने राजकीय क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी, महिला बचत गटांच्या माध्यमातून अनेक महिलांना रोजगार निर्मिती आरोग्य शिबिर रक्तदान शिबिर तसेच आपले राष्ट्रीय सण व पारंपारिक सण साजरी करून वाढविलेले महिलांचे संघटन यापूर्वीच त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना ध्यास फाउंडेशन मावळ वतीने सन्मानित करण्यात आले आहे.आपल्या डोणे गावातील महिला या अधिक सक्षम व्हाव्या महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या याकरिता अश्विनी बाळासाहेब घारे या नेहमी प्रयत्नशील असतात, तसेच डोणे गाव हे आपले आदर्श गाव म्हणून ओळखले जावे, यासाठी त्या नेहमी प्रयत्नशील असतात. तसेच डोणे गावातील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थींनी विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे, तसेच ही शाळा स्मार्ट स्कूल म्हणून नावारुपास यावी यासाठी अश्विनी बाळासाहेब घारे कार्यरत आहेत. राष्ट्रीय सण तसेच आपले पारंपारिक सण या माध्यमातून त्यांनी महिलांचे मोठे संघटन वाढविलेले आहे. आपले गाव व्यसनमुक्त राहावे, गावाला पुरेसा पाणीपुरवठा मिळावा, गावातील नागरिकांचे आरोग्य उत्तम असावे, शैक्षणिक व्यवस्था उत्तम असावी, गावातील रस्ते रहदारीसाठी उपयुक्त असावे, गावाला पुरेसा विज पुरवठा व्हावा, गावात नेहमी स्वच्छता राहावी, गावातील युवकांना रोजगार मिळावे महिलांना रोजगार उपलब्ध व्हावे याकरिता सौ. अश्विनी बाळासाहेब घारे याने मी प्रयत्नशील असतात त्यांच्या याच सामाजिक कार्याची दखल घेत शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने दिला जाणारा आदर्श नागरिक पुरस्कार सौ आश्विनी बाळासाहेब घारे यांना देण्यात येत आहे.

www.shabnamnews.in
संपूर्ण महाराष्ट्रातील बातमी एका क्लिक वर
SHABNAM NEWS
# शबनम न्यूज
मराठी वृत्तपत्र,वृत्तवाहिनी, मराठी न्यूजपोर्टल
विश्वसनीय वृत्तसंस्था
दिनांक 16/03/2025
आदर्श नारी पुरस्कार विशेषांक

## उन्नती सोशल फाऊंडेशन तर्फे “छावा” चित्रपटाचा भव्य शो...

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपळे सौदागर:- पिंपरी चिंचवड शहरातील विविध सामाजिक कामांसाठी प्रसिद्ध असलेल्या , उन्नती सोशल फाऊंडेशन आणि पी.के.इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वराज्यरक्षक , धर्मवीर छ.संभाजी महाराज यांच्या अजोड पराक्रमाची साक्ष देणाऱ्या छावा चित्रपटाचा भव्य प्रीमिअर शो , पी.के.इंटरनॅशनल स्कूल येथे आयोजित करण्यात आला. या प्रीमिअर शो ला पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील नागरिक बंधू-भगिनी , अबालवृद्ध , तरुण-तरुणी यांनी उदंड प्रतिसाद दिला. छ.संभाजी महाराजांचा क्रूरकर्मा औरंगजेबाने केलेला ‘मृत्यूलाही देखील भय वाटेल असा केलेला छळ’ पाहताना पिंपळे सौदागर वासीयांच्या कडा पणावल्याचे पाहायला मिळाले.




तत्पूर्वी , जागतिक महिला दिनाच्या औचित्याने विविध क्षेत्रात कर्तबगार कामगिरी करणाऱ्या महिलांना उन्नती सोशल फाऊंडेशन तर्फे विशेष सन्मानित करण्यात आले.

या सन्मान सोहळ्यात ॲड.हिमानी सूर्यवंशी (घरगुती हिंसाचार विरोधी चळवळ) पोलीस उपनिरीक्षक तेजश्री मैसाले , पी.के.इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या डॉ.धनश्री सोनवणे , क्रीडा प्रशिक्षक संपदा कुंजीर , प्रजापती ब्राह्मकुमारीज च्या बी.के. दिव्या दीदी , समुपदेशक डॉ.नेहा पंजाबी , फिजिओथेरपिस्ट डॉ. स्नेहल सुरोशे , शोभा फिटनेस सेंटरच्या सर्वेसर्वा आणि नृत्यदिग्दर्शक शोभा पोवार , महिला उद्योजिका सिमरन पंजाबी आणि सफाई कर्मचारी लता गौतम जगताप यांना सन्मानचिन्ह , शाल आणि श्रीफळ प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी , मनोगत व्यक्त करताना उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ.कुंदाताई भिसे म्हणाल्या , “छत्रपती संभाजीराजे यांनी धर्म, स्वराज्य आणि स्वाभिमान यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. छावा चित्रपटाच्या माध्यमातून , स्वराज्य रक्षक आणि धर्मवीर छ.संभाजीराजे यांच्या अतुलनीय धैर्याची आणि बलिदानाची आठवण ठेवून नवचैतन्याने आपल्याला पुढे जायचे आहे. छत्रपती संभाजीराजे हे केवळ एक पराक्रमी योद्धाच नव्हते, तर विद्वान, कुशल शासक आणि एक निडर नेतृत्व होते. त्यांनी धर्म आणि स्वराज्यासाठी दिलेल्या त्यागाला आज संपूर्ण महाराष्ट्र आणि हिंदुस्थान नतमस्तक आहे.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना देखील सन्मानित केले. खरे म्हणजे , आज या ठिकाणी उपस्थित प्रत्येक महिला ही एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे, जिने आपल्या मेहनतीने, जिद्दीने आणि आत्मविश्वासाने स्वतःची ओळख निर्माण केली आहे.आपल्या इतिहासाकडे पाहिले, तर आम्हाला अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे यांसारख्या अनेक स्त्रिया दिसतात, ज्यांनी आपल्या कार्याने समाजात अमूल्य योगदान दिले.

त्या केवळ कर्तृत्ववान नव्हत्या, तर पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्तंभ ठरल्या. आजच्या आधुनिक युगातही महिलांनी विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय, कला, क्रीडा, शिक्षण आणि समाजसेवा या प्रत्येक क्षेत्रात आपली छाप पाडली आहे. त्यांचे संघर्ष आणि यश पाहून असे वाटते की, “स्त्री ही केवळ गृहिणी नाही, तर ती कुटुंबाचा आणि समाजाचा आधारस्तंभ आहे.” याप्रसंगी , पी.के.इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक श्री.जगन्नाथ आप्पा काटे , उन्नती सोशल फाउंडेशन चे संस्थापक श्री.संजय तात्याबा भिसे, उन्नती सखी मंच उपाध्यक्षा रश्मी मोरे, यांच्यासह , शेखर काटे, विकास काटे,दादा इंदूरे,अतुल पाटील, विशाल वाळके,अजिंक्य भिसे, विठाई वाचनालय चे सभासद, आनंद हास्य क्लबचे सभासद , ऑल सिनियर सिटीजन्स असोसिएशन चे सर्व सभासद तरुण वर्ग आणि पिंपळे सौदागर ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिक बंधू-भगिनी आदी उपस्थित होते सूत्रसंचालन भामिनी महाले यांनी केले




## पिंपरी न्यायालयाचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप




पिंपरी न्यायालयाचा 36 वा वर्धापन दिन आणि महिला दिनाचा सोहळा शनिवार, दिनांक 08 मार्च 2025 रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड येथे पार पडला. दिनांक 8 मार्च 1989 रोजी पिंपरी - चिंचवडमध्ये पहिले न्यायालय सुरु झाले. एक न्यायालय ते आज सुसज्ज अशा नेहरुनगर येथील इमारतीमध्ये सुरु असलेले एकूण दहा दिवाणी फौजदारी न्यायालय यामागे मोठा संघर्ष पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वकिलांनी केलेला आहे. या मागील 36 वर्षांतील सर्वच आठवणींनी यावेळी उजाळा देण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष तथा आळंदी देवस्थानचे माजी विश्वस्त ॲड. विकास ढगे पाटील, पुणे जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एल. टिकले, पुणे बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड व त्यांची संपूर्ण कार्यकारिणी, महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जाती जमातीचे सदस्य सचिव ॲड. गोरक्षनाथ लोखंडे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त बालकलाकार कु. आकांक्षा पिंगळे, पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर तसेच पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे सर्व माजी अध्यक्ष, पदाधिकारी व वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी वर्धापन दिनानिमित्त पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने दिनांक 27 मार्च ते 04 फेब्रुवारी 2025 या कालावधीत क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. पिंपरी - चिंचवड शहरातील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त बालकलाकार कु. आकांक्षा पिंगळे त्याचबरोबर पिंपरी न्यायालयात कार्यरत असणाऱ्या सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. क्रांती दीपाली दयानंद कुरळे यांच्या यशामागील संघर्षाबद्दल विशेष सन्मान यावेळी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक यांच्या हस्ते करण्यात आला. भारतीय महिला खो-खो संघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे या सदर कार्यक्रमास उपस्थित राहू न शकल्याने त्यांनी फोनद्वारे दिलगिरी व्यक्त करत वर्धापन दिनानिमित्त उपस्थित सर्व वकिलांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेवर असलेले रामायण, महाभारत आणि गौतम बुद्ध यांची चित्रे आपल्यातील समानता अधोरेखित करतात, त्याचबरोबर महिला दिनानिमित्त देशात कोसळत चाललेली विवाह संस्था यामधील महिलांचे घर बांधून ठेवण्यासाठीचे प्रयत्न, भारतात रुजत चाललेली लिव्ह- इन-रिलेशनशिप संस्कृती, महिलांच्या हक्काच्या दिशेने घडलेल्या घडामोडी आणि महिला दिनाची झालेली सुरुवात, त्याचबरोबर महिलांच्या विविध प्रकरणात सुप्रीम कोर्टाने महिलांच्या हक्क अबाधित राहावेत यासाठी दिलेले निकाल यावर न्यायमूर्तींनी भाष्य केले.

## पावसाळ्यापूर्वीची कामे सुरु करा : निखिल दळवी

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप





पिंपरी चिंचवड शहरातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवा सेनेचे शहर उपप्रमुख तथा विठ्ठल प्रतिष्ठानचे अध्यक्ष निखिल दळवी यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्त यांच्याकडे पिंपरी चिंचवड शहर पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे सुरु करण्याची मागणी केली आहे त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की,लवकरच पावसाळा सुरु होणार आहे तरी प्रभाग क्रमांक 14 व प्रभाग क्रमांक 15 या दोन्ही प्रभागांमधील दत्तवाडी विठ्ठलवाडी विवेक नगर क्रांतीनगर टेल्को कपूर कॉलनी एकता नगर आकुर्डी गाव गंगा नगर पंचतारा नगर गुरुदेव नगर शुभ श्री सोसायटी परिसर भंगारवाडी गणेश नगर या सर्व परिसरांमधील नाले ओढे ड्रेनेज लाईन स्ट्रॉम वॉटर लाईन यांची स्वच्छता व साफसफाई करण्यात यावी जेणेकरून मोठ्या प्रमाणात पाऊस झाला तर नाले ओढे ड्रेनेज लाईन स्ट्रॉम वॉटर लाईन मध्ये कचरा साचल्याने अडकल्याने पाणी ओव्हर फ्लो होऊन परिसरात शिरणार नाही याच्यासाठी सर्वतो उपाययोजना पावसाळ्या अगोदरच कराव्यात जेणेकरून आकुर्डी मधील कोणत्याही परिसरात पावसाळ्यात पाणी साचणार नाही व परिसरात शिरणार नाहीयाची दक्षता घ्यावी व पावसाळ्यापूर्वीची सर्व कामे लवकरात लवकर सुरु करावे अशी मागणी निखिल दळवी यांनी मनपा आयुक्तांकडे दिलेला निवेदनात केली आहे.

## पुणेकरांचे प्रेम कधीही विसरू शकत नाही - अशोक सराफ

### कै.प्रकाश ढेरे स्मृत्यर्थ कला जीवन गौरव पुरस्कार

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप



पुणे : महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण अशा थोर व्यक्तीच्या नावाने मला पुरस्कार मिळाला, हे माझे भाग्यच आहे. पुणेकरांनी आजपर्यंत मला भरभरुन प्रेम दिले आहे, त्यांचे हे प्रेम मी कधीही विसरु शकणार नाही. मला मिळालेले पुरस्कार मी जपून ठेवले असून ते मला सतत ऊर्जा देणारे आहेत, अशी भावना ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी व्यक्त केली.

स्व. प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट व गंगालॉज मित्र मंडळातर्फे पहिले मुख्यमंत्री, लोकनेते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण कला व साहित्य पुरस्कार समारंभात कै. प्रकाश ढेरे स्मृत्यर्थ ‘कला जीवनगौरव पुरस्कार’ ज्येष्ठ मराठी अभिनेते अशोक सराफ यांना ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते टिळक स्मारक मंदिरात प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते नागराज मंजुळे उपस्थित होते.

याप्रसंगी सुनिता झाडे (नागपूर) यांना 'शब्दांच्या पसाऱ्यातील आत्महत्या' या कविता संग्रहासाठी कै. शिवाजीराव अमृतराव ढेरे यांच्या स्मृत्यर्थ ‘साहित्य पुरस्कार’, फेलिक्स डिसोजा (वसई) यांना आरशात ऐकु येणार प्रेम या कविता संग्रहासाठी कै. बाबासाहेब जाधव यांच्या स्मृत्यर्थ साहित्य पुरस्कार, सफर अली इसफ (वैभववाडी) यांना 'अल्लाद ईश्वर' कवितासंग्रहासाठी कै. धनाजी जाधव स्मृत्यर्थ ‘साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.जेष्ठ कवी डॉ. विठ्ठल वाघ, ज्येष्ठ कवी व वात्रटिकाकार रामदास फुटाणे, जेष्ठ लेखक व कवी प्रा. फ.मु. शिंदे, अशोक नायगावकर, ट्रस्टचे विजय ढेरे, संजय ढेरे, ज्येष्ठ नेते उल्हास पवार, गौरव फुटाणे, सचिन जाधव, कुणाल जाधव आदी यावेळी उपस्थित होते.

पुरस्काराला उत्तर देताना अशोक सराफ म्हणाले, थोर व्यक्तीच्या नावाने मला पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार माझा सन्मान आहे, प्रेम मी विसरणार नाही. स्व. प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्टचा ऋणी आहे. पुणेकरांनी नेहमीच माझे कौतुक केले याचेही यावेळी त्यांनी नमूद केले.

डॉ. मोहन आगाशे म्हणाले, अशोक सराफ हा कलाकार तळागाळात मिसळणारा आहे. त्यांच्यात बडेजावपणा, इगो अजिबात नाही. कधीही केव्हाही भेटणारा साधा सरळ हा माणूस आहे. साध्या सरळ माणसाला हा पुरस्कार मिळाल्याने खरोखर आनंद आहे.

नागराज मुंजुळे म्हणाले, अशोक मामाच्या साध्या आणि सरळ स्वभावामुळे मीच नव्हे तर अख्खा महाराष्ट्र त्यांचा चाहता आहे. हा माणूस आभाळासारखा आहे. कारण मी त्यांना अनुभवलं आहे. मी काहीही नसताना त्यांचा बाईट घेण्यासाठी गेलो असता, कुठून आला, कोण आहेस असे कोणतेही आढेवेढे न घेता माझ्या खांद्यावर हात ठेवून मला पहिला बाईट दिला. हा माणूस चित्रपट क्षेत्रातलाच नव्हे तर खऱ्या जीवनातला देखील हिरो आहे, सही यावेळी त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, ढेरे व जाधव परिवाराने गेली 39 वर्षे कार्यक्रमातून यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जतन ठेवल्या आहेत. यशवंतराव चव्हाण यांचा संस्कृतपणा आणि राजकारण पुढे घेऊन जायचे आहे. सध्याची महाराष्ट्राच्या राजकारणातील सुसंस्कृतपणा हरवत चाललेला आहे. महाराष्ट्राचा सुसंस्कृतपणा जोपासण्याचे आपले सर्वांचे काम आहे. यशवंतरावाचा सुसंस्कृतपणा ढेरे-जाधव परिवार जोपासत आहे कौतुकास्पद आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल दामले यांनी केले.

मराठी मातीचा सुगंध, हळव्या मनाच्या माणसांनो काळजी घ्या थोडी, आता दिवसेंदिवस जगणं कठीण होत चाललं, आमच्या पप्पांनी आमदार फोडला.., मला आई व्हायचं नाही., कुणाचे आहे शरीर काही विखुरलेली छिन्न, स्त्री कधी मंदिरातील विना..., हे 376 दाखल करणाऱ्या माझ्या प्रिया बापांनो, तुमच्या आई-लेकीनं, बापू तुमचा चष्मा हरपला, भक्त कुणाचाही असो, काळ्या मातीत मातीत, कुणाच्या नावाचं डोरलं गळ्यात, आणि माझे दुःख गळून गेलेअशा वास्तव जीवनावर कविता सादर करुन श्रोत्यांना अंतर्मुख केले. सध्याच्या कोलमोडून पडलेल्या राजकीय परिस्थितीवर कवीनीं आपली कविता सादर करुन लोकशाही जीवंत ठेवण्याचे आवाहन कवि संमेलनातून केले. श्रोत्यांनी यावेळी कविसंमेलनाला भरभरुन दाद दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. सत्कारानंतर राज्यभरातून आलेल्या प्रख्यात कवींचे कवी संमेलन रंगले. गेली 39 वर्षांपासून यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त पुरस्कार सोहळा कवी संमेलन अविरतपणे होत आहे. दरम्यान कवी संमेलनाला श्रोत्यांची तुडुंब गर्दी झाली होती.

तीन पुरस्कार विजेते कवींसह अंजली कुलकर्णी, प्रकाश होळकर, कल्पना दुधाळ, मृणालिनी कानिटकर, अनिल दीक्षित, बालिका विखले, वैशाली पतंगे, शशिकांत तिरोडकर, नितीन देशमुख, गुंजन पाटील यांनी सहभाग घेतला होता. ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे, प्रा. फ. मुं. शिंदे व अशोक नायगावकर यांनी कवि संमेलनाचे सूत्रसंचालन केले. यावेळी राजकारण, समाजातील व्यथा कवितेतून केले. तसेच आपल्या खास भाषेतून कविता सादर करुन श्रोत्यांची मने जिंकली. टिळक स्मारक मंदिर श्रोत्यांनी तुडूंब भरले होते. नितीन देशमुख यांनी यशवंतराव ही कविता सादर करुन कवी संमेलनाची सुरुवात केली .

ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ यांनी ' माझ्या मराठी मातीचा सुगंध मला जीवापाड छंद ही कविता सादर करुन इजात मराठी भाषेचा गौरव केला.

नितीन देशमुख यांनी 'फुलात भिजल्या, लाटात भिजली होडी, हळव्या मनाच्या माणसांनो काळजी घ्या थोडी वेगवेगळी फुलझाडे पाचोळा झाली आता, सर्व कमळाच्या फुलापाशी गोळा झाली आता सध्याच्या राजकारणावर विडंबन करणारी कविता त्यांनी सादर केली. त्यांनी टाळ्यांची दाद देत कवीने वाह वा मिळवली.

रामदास फुटाणे यांनी ' शूर आम्ही आमदार आम्हाला ईडीची भीती' ही सद्य स्थिती वर कविता सादर करुन कवि संमेलनात रंग भरला. ज्येष्ठ कवी फ. मु .शिंदे यांनी 'कळेना काय कुठे कुठवर हे भोगावे ही कविता सादर करुन अंतर्मुख केले.

कल्पना दुधाळ यांनी माळरानावरील शेतीची परिस्थिती, शेतकऱ्यांच्या कष्टाचे चित्रण ' वस्तीवर करवंदाची झाडे असती अजुन' या कवितेतून मांडली. तर प्रकाश होळकर यांनी देखील करायच्या बिकट परिस्थितीवर कविता सादर करुन अच्छे दिन कधी येणार? असा सवाल आपल्या कवितेतून उपस्थित केला. 'आता दिवसेंदिवस जगणं किती कठीण होत चाललेलं' या कवितेतून शेतकऱ्याच्या व्यथा त्यांनी मांडल्या. सुनिता झाडे यांनी ' काय बरं ओवती ती' महिलेच्या संघर्षावर कविता सादर केली. फेलिक्स डिसोजा यांनी 'कुणाच्याच कसं आलं नाही लक्षात' ज्येष्ठ महिलेवरील कविता सादर केली. सफर अली इसफ यांनी ' कवी शब्दांची रोजच खेळत असतो' या कवितेतून दारिद्र्य, लोकशाही, बेरोजगारीची दाहकता मांडली.

गुंजन पाटील, वैशाली पतंगे, बालिका विखले आणि सुनीता झाडे यांच्यासह इतर कवींनी कविता सादर करुन महिला सुरक्षितेचे आवाहन केले.

गझल, प्रेमगीते, राजकरण्यांवर विडंबन कविता सादर करत उत्तोरात्तर संमेलन रंगत गेले. त्याचबरोबर कवि रामदास फुटाणे व अशोक नायगावकर यांच्या खास शैलीतील किस्यात श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

कवयित्री कवितेद्वारे तसेच यांनी महिलांच्या समस्या, व्यथा आणि स्वाभिमान त्याच्या रचनांतून मांडल्या. महिलांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते यावर भाष्य केले. अनिल दीक्षित यांनी राजकारणी पत्रातून जनतेला काय मागणी करतो त्यांच्या विडंबन कवितेतून सादर केले. अनेक कवींनीं राजकीय त्याच्या व्यंगावरील कवितेने रंग भरला. या कवितेला रसिकांची चांगली दाद मिळाली. कवि संमेलनात कवींनी एकाहून एक सरस कविता सादर करुन श्रोत्यांची वाहवा मिळविली. कवयित्रींकडून स्त्रियांच्या जिव्हाळा, निसर्गसौंदर्य, प्रेम-विडंबन, अशा अनेक विषयांना स्पर्श करत कवींनी रसिकांना खिळवून ठेवले होते. तर निसर्ग व प्रेम कवितांच्या सादरीकरणाने कवींनीं श्रोत्यांची वाहवा मिळविली. कवि डॉ. विठ्ठल वाघ यांनी आपल्या खास आवाजात गुलामगिरी वरील अरे कसं सासून ही कविता सादर करुन कार्यक्रमाचा समारोप केला. या कवी संमेलनास विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून कवितेचा आस्वाद घेतला